**१) अभंग :**

**वायुरूप निरंजना । काय वानू तुझे ध्याना ।।१ ।।**
**नाही हालत चालत । नाही बोलत खेळत ।।२ ।।**
**नाही भासत नासत । घन निश्चळ पूर्णाव्यक्त ।।३ ।।**
**सर्वव्यापित्व नि:शब्द । घनदाट तू अभेद ।।४ ।।**
**गुण अगुण सगुण । तू पां नव्हेसी निर्गुण ।।५ ।।**
**अवघेचि निरंजन । तेथे दासराम कवण ।।६ ।।**

**विवरण :**

अत्यंत शुध्द अशा वायुरूप निरंजना, तुझे ध्यानरूप कसे बरे वर्णू ? चैतन्यरूपी निरंजन ब्रह्म हालत नाही, चालत नाही, बोलत नाही, खेळत नाही, भासत नाही, नासत नाही. हे निरंजना, तू केवळ घन, निश्चळ, पूर्ण, अव्यक्त, सर्वव्यापी, नि:शब्द, घनदाट व अभेदपणाने आहेस. गुण, अगुण, सगुण आणि सगुणाच्या अपेक्षेने असलेले निर्गुण अशा कोणत्याही गुणसंबंधाने तू नाहीस. तू अवघ्या ठिकाणी सर्वत्र व्यापून आहेस. अशा ठिकाणी दासराम तरी वेगळेपणाने कोण बरे आहे ? (१ ते ६)

**२) अभंग :**

**विज्ञान आटले । तेथे निरंजन उरले ।।१ ।।**
**नाही गुप्त ना प्रगट । परी हा उघडाचि निघोट ।।२ ।।**
**आत्मा लक्षिता साक्षात । वेडावली पा प्रचित ।।३ ।।**
**दासरामी समाधान । डोळियातु परिपूर्ण ।।४ ।।**





**शब्दार्थ :**

(१) निघोट – परिपूर्ण, सघन (२) लक्ष – अवधान

(३) लक्ष्य – नेम धरलेली वस्तु

**विवरण :**

अज्ञान अवस्थेत आत्म्याचे ज्ञान नसते. ज्ञानावस्थेत त्याचे वेगळेपणाने ज्ञान होते. विज्ञान अवस्थेत ज्ञानामधील वेगळेपणाने पाहण्याची जाणीवही नाहीशी होते. परंतु निरंजनाच्या ठिकाणी या सर्व अवस्था आटलेल्या असतात. असे हे सघन, परिपूर्ण, निरंजन चैतन्य सर्वत्र उघडपणे आहे. ( १–२)

चैतन्य नाही अशी जागाच नाही. परंतु ज्ञानावस्थेत ते प्रकट व अज्ञानावस्थेत ते गुप्त असल्याचे जाणवते. अशा या परिपूर्ण आत्म्याला लक्ष्य केले असता डोळ्यांच्या अंतरी त्याची प्रचिती येते. आनंदाने वेडे होणारा हा अनुभव असून त्यामुळे दासरामाला पूर्ण समाधान प्राप्त झाले आहे. (३–४)

**३) अभंग :**

**केवळ आनंद । सार हरी आत्मा गोविंद ।।१ ।।**
**निरंजनीची लहरी । जे का अव्यक्त अंतरी ।।२ ।।**
**मूळ सद्रुप निघोट । तेथे आनंदाची लाट ।।३ ।।**
**आत्मरूपाचा आनंद । शुध्द नि:ष्काम नि:शब्द ।।४ ।।**
**हरी आनंद निष्काम । तेथे कैचा दासराम ।।५ ।।**

**विवरण :**

ब्रह्म/परमेश्वर सच्चिदानंदरूप आहे. त्यातील मूळ सत्‌रूप निरंजन हे सघन, परिपूर्ण असे आहे. निरंजनाच्या ठिकाणी अव्यक्त रूपाने लहरी असतात. त्या निरंजनाचा विलास म्हणजे तेथे व्यक्तरूपाने उठणाऱ्या चैतन्याच्या लहरी होत. तेथील चैतन्याच्या लाटा म्हणजे साररूप अशा हरिगोविंदाचे आनंदाने नटणे होय. सत्‌रूप आणि चिद्‌रूप एकत्र झाले की आनंद हा असतोच. अशा आत्म्याचा आनंद हा शुध्द, निष्काम आणि नि:शब्द स्वरूपाचा असून असा अनुभव अंतरी आल्याने दासराम आनंदरूपच होऊन गेला आहे. (१ ते ५)

**४) अभंग :**

**वारा हा प्राणदाता श्रीरामकृष्णी या ।**
**पीतात्मा अग्निरुपा आनंदू डोळिया ।**
**नि:शब्द श्रीहरी तो आत्मा हा आत्मया ।**
**निश्चळी या सद्‌घनू तो पहाताची रामी या ।।१ ।।**

**विवरण :**

रामकृष्ण ह्या जीवनाच्या दोन गती आहेत. या गतीवरूनच जीवाचे अस्तित्व कळते. रामकृष्णवाचा हा जीवाचा भाव आहे. या गतीमध्ये चैतन्यच प्राणरूपाने असते. रामकृष्णगतीमध्ये प्राणाची धारणा होते. यामुळेच चैतन्य जीवरूपास प्राप्त होते. शरीरांतर्गत चैतन्यास आत्मा म्हणतात. सहस्त्रदळी आत्मसूर्याच्या ठिकाणी अग्निज्वाळा पीतवर्णाने उसळत असतात. हा आत्मसूर्य डोळ्यांचाही डोळा आहे. या डोळ्यांच्या डोळ्यानेच आनंदब्रह्माचा अनुभव येतो.

निश्चळ परमात्म्याची चैतन्यसत्ता सामान्यरुपाने सर्वत्र असते. ही



श्रीदासराममहाराज विरचित
वायुलहरी - विवरण

चैतन्यसत्ता सत्‌घनरुपाने असते. हे निश्चळ नि:शब्द हरीरूप चंचळ आत्म्याचाही आत्मा आहे. अशा या निश्चळ सत्‌घन श्रीहरीला पाहताना दासरामही निश्चळच होऊन राहिला आहे. (१)

**५) अभंग :**

**पुरे पुरे तुझा लपंडाव की रे ।।धृ ।।**
**सर्वव्यापी गा तू हरी । नवल तुझे कोणेपरी ।**
**पहावे कोणीतरी । तुला ना कळे रे ।।१ ।।**
**मूळ निरंजन तू वारा । चराचरा तूची भारा ।**
**तुजवीण खरा । कुणी नाही की रे ।।२ ।।**
**अहंकार अंगराख । घातियेला तू विषेख ।**
**तुझे नामी सुख । पहाता आहे खरे ।।३ ।।**
**शब्दरूप अलंकार । तेणे जाले चराचर ।**
**मुख अरुवार । तुझे उघडेची रे ।।४ ।।**
**उघडाची माझा राम । पहाणे बुडाले संभ्रम ।**
**कोण दासराम । तेथ वेगळा की रे ।।५ ।।**

**शब्दार्थ :** (१) अरुवार – सुंदर (२) भारा – भार (भरणे)

**विवरण :**

हे हरी, तुझा हा लपंडाव पुरे कर.

हे हरी, तू प्रकट ना गुप्त स्वरुपाने आहेस. तू प्रकटताच जगदाभास संपतो, दृश्याचा निरास होतो. तू लपताच दृश्य प्रकटते व जगदाभास सुरु होतो. अशा

नवलाईने नटलेल्या सर्वव्यापी हरी, तुला कोठे, कोणी आणि कसे बरे पहावे हेच कळत नाही. (१)

तूच मूळ निरंजन निश्चळ वारा असून तूच चराचरामध्ये भरला आहेस. निखळ 'असणेपणाने' असणारे तुझे अस्तित्व पूर्णत: खरे आहे. (२)

निश्चळसत् चे पहिले स्फुरण हेच अहंकाराचे मूळ रूप होय. असा अहंकाररूपी अंगरखा तू परिधान केला असून चराचररूपाने शब्दरूप अलंकार घातले आहेस. मात्र विश्वरुपाने तुझे हे सुंदर मुख मात्र उघडेच आहे. अशा तुझ्या या दर्शनामध्ये व तुझ्या नामामध्ये सर्वसुख आहे. (३-४)

असा हा निरंजन निश्चळ राम प्रकट होतो, उघड होतो तेव्हा मनाचा संभ्रम नाहीसा होतो. वेगळेपणाने पहाणे संपते आणि केवळ निखळ पहाणेपण उरते. अशा वेळी हा दासरामही वेगळेपणाने रहात नाही. (५)

**६) अभंग :**

**वायु घर्षणी या प्रभा । पीतरूप आत्मगाभा ।।१ ।।**
**तेचि अग्निरुप सोहं । जीवभाव नुरे कोहं ।।२ ।।**
**गुण निर्गुण नासिले । पाप पुण्य दहन झाले ।।३ ।।**
**दासरामी सोहं ध्यान । जीवभावा पडले मौन ।।४ ।।**

**विवरण :**

चैतन्य हे वायुरूप आहे. अशा या वायुरूप चैतन्याच्या घर्षणातून उत्पन्न होणारी पीतप्रभा हाच आत्मस्वरुपाचा गाभा होय. तोच अग्निरूप सोहं आत्मा





होय. अशा सोहं आत्म्याचा साक्षात्कार होताच जीवाचा कोहंभाव नाहीसा होतो. (१-२)

गुण, निर्गुण, पाप-पुण्य अशा द्वंद्वभावाचे दहन होते. अशा सोहंभावाचे ध्यान दासरामाला लागल्याने जीवभावाला मौनत्व प्राप्त झाले आहे. (३-४)

**७) अभंग :**

**पीत ब्रह्मीचे पहाणे । महत् बह्मीचे देखणे ।।१ ।।**
**देखणे हा उंबरठा । दोनी वाटेचा चव्हाटा ।।२ ।।**
**आत्मलहरीचे गुणे । जाले आकारीचे लेणे ।।३ ।।**
**बोलिजे त्या महाशून्य । विशुध्दात्म्याचे दर्शन ।।४ ।।**
**श्वेत कळेआतु । आत्मसंकल्प निवांतु ।।५ ।।**
**चार चार आठ । शून्याची ते एकवट ।।६ ।।**
**दासरामी मौन । सोहंनामी समाधान ।।७ ।।**

**शब्दार्थ :** चव्हाटा – ठिकाण

**विवरण :**

सहस्त्रदळाच्या माथ्यावर चमकणाऱ्या पीतप्रभेचा साक्षात्कार हे ब्रह्माचे सगुण रूप आहे. ही पीतप्रभा एकीकडे महत्‌ब्रह्म तर दुसरीकडे महाकारणदेहातील तुर्यावस्था यामधील उंबरठ्याचे काम करते. ब्रह्म आणि माया या दोन्ही वाटांच्या अनुभवाचे ते ठिकाण आहे. येथून पलिकडे असलेल्या विशुध्द महाशून्य अशा निश्चळ महत्‌ब्रह्माचे दर्शन होते. तसेच अलिकडील महाकारण देहामधील

आत्म्याच्या प्रकर्षाचे नाद, बिंदू, कला, ज्योती यांचाही अनुभव येतो.

परब्रह्माच्या/आत्म्याच्या सहज संकल्पापोटी उत्पन्न झालेल्या शुभ्र प्रकाशाचा अनुभव येतो. हा अनुभव म्हणजे चैतन्यलहरींच्या गुणांमुळे आकाराला आलेले लेणेच होय. (१-५)

चार देहांची चार व चार अवस्थांची चार अशी आठ शून्ये पार केल्यानंतर महाशून्याची प्राप्ती होते. हीच खरी मौनावस्था होय. सोहं नामाने असे मौनत्व साधल्याने दासरामाला पूर्ण समाधान झाले आहे. (६-७)

**८) अभंग :**

**पीत आत्मा शून्य गेही । पूर्णपणे अंतर्बाही ।।१ ।।**
**पीत लहरी ब्रह्माकार । पुढे शून्याचा विस्तार ।।२ ।।**
**तेथ आत्म्याचे स्फुरण । परिपूर्ण जे विज्ञान ।।३ ।।**
**तोचि शुध्द आत्मा शिव । विकासला स्वयंमेव ।।४ ।।**
**शिव आत्मा आत्मवाणी । साक्षिरूप राम ध्यानी ।।५ ।।**
**चैतन्या विश्रांती । अवघी प्रकाशाची व्याप्ती ।।६ ।।**
**अवघाचि प्रकाश । उफाळला चिदाभास ।।७ ।।**
**वर्णवेना रूप रंग । दासरामी हरीचा भाग ।।८ ।।**

**शब्दार्थ :** गेही - घरी, गृही

**विवरण :**

आकाशरूप महाकारण देहाच्या गृही पीतप्रकाशयुक्त आत्मा अंतर्बाह्य व्यापून असतो. येथील पीतलहरी ब्रह्मापासून उत्पन्न झालेल्या असतात. त्यामुळे त्या परिपूर्ण व ब्रह्माकार असतात. महाकारण देहातील शून्यामध्ये असलेल्या





चैतन्यलहरींचा विस्तार देहाला व्यापून असतो. याच चैतन्यलहरी बाहेर विश्वामध्येही पूर्णपणे पसरलेल्या असतात. महाकारण देहातील अनुभवाची ज्ञानावस्था संपून त्याची पूर्णावस्था म्हणजे विज्ञान अवस्था होय. (१ ते ३)

सत्रुप चैतन्याच्या स्फुरणातून पीतप्रकाशयुक्त मूळमाया निर्माण झाली. तेथील सूक्ष्म भेदातून जीवाशिवाची उत्पत्ती झाली. अशा तऱ्हेने साक्षिरूप स्वयमेव उत्पन्न होणारा शुध्द चैतन्य आत्मा म्हणजे शिव होय. असा हा शिवदेखील त्या निश्चळरुपी रामाचे ध्यान करीत आहे. हा शिव सर्वत्र प्रकाशरुपाने व्यापून आहे. त्या शांत अशा प्रकाशाच्या अनुभवाने जीवाला खरी विश्रांती प्राप्त होते. अशा या महाकारण देहामधील उफाळलेल्या रंगरूप स्वरुपाचे वर्णन कसे बरे करावे ?

हा दासरामही वेगळेपणाने न राहता त्या हरीरूपाचा भाग होऊन राहिला आहे. (४ ते ८)

**९) अभंग :**

**शिव आत्मा तो निर्गुण । तेथ रामकृष्ण सगुण।।१ ।।**
**जेथ वारे हे उफराटे । चिद्‌गुणाचा नाद प्रगटे।।२ ।।**
**शिवरुपी जे लहरी । कोंदली जे शून्यावरी ।।३ ।।**
**चिदाचिदाचा पसारु । शून्या ऐलाडू व्यापारू ।।४ ।।**
**श्वेतश्याम उष्ण शीत । रूप जीवभाव व्यक्त ।।५ ।।**
**चिदाकाशी चिदाभास । दोनी जाले दृश्यादृश्य ।।६ ।।**
**दासरामी रामकृष्ण । जे का जाहले चिद्‌गुण ।।७ ।।**

**शब्दार्थ :** (१) कोंदणे - गच्च भरणे (२) ऐलाडू - अलिकडील

**विवरण :**

रामकृष्णगती हा जीवाचा भाव असून ते त्याचे सगुण रूप आहे. उर्ध्वगामी गतीमध्ये चैतन्याचे वारे उफराटे वाहू लागले. असे हे वारे निर्गुण शिवात्म्यात मिसळत राहते तेव्हा अनाहत नादाचा प्रकर्ष होतो. येथील शिवरूप चैतन्यलहरी महाकारण देहाच्या शून्य आकाशात कोंदाटतात तेव्हा चिदाभास उफाळतो. या चिदाभासामध्ये श्वेत, श्याम, उष्ण, शीत, तसेच दृश्य, अदृश्य अशी द्वंद्वात्मक गुणतत्वे बीजरूपाने प्रकट होतात. ह्या बीजांपासूनच पुढे त्रिगुण व पंचमहाभूतांचा विस्तार होतो. ह्यामुळेच पुढे चिदाचिदानी भरलेले विश्व व जीव यांची निर्मिती होते. हे विश्व व त्यामधील जीव यांचे व्यक्त रूप हा सारा महाकारण देहाच्या म्हणजेच चिदाकाशाच्या अलिकडील विस्तार होय. (१ ते ६)

हा दासराम चिद्‌गुणानी युक्त अशा रामकृष्ण गतीशी समरस होऊन राहिला आहे. (७)

**१०) अभंग :**

**लागला हृदयीच वारा। म्हणुनी जाहला अंगी उबारा ।।१ ।।**
**रामकृष्णी नभ तेजे जाले। पीतप्रभेचा नील पसारा ।।२ ।।**
**चिदाकाश ते शून्य व्यापिले। शब्दाशब्द असारा सारा ।।३ ।।**
**पीत आत्मता रामकृष्णी या। केवी मिळाली गुण ॐकारा ।।४ ।।**
**जीवदशे प्रकृती साधिली। दासरामी रूप नाम चतुरा ।।५ ।।**

**विवरण :**

प्रकृतीपासून सर्व विश्व उत्पन्न झाले आहे. विश्वामधील जीवांना जीवदशा प्राप्त झाली आहे. देहामध्ये शिरोहृदयात चैतन्याचा वारा प्रवेश करतो म्हणून





त्याला जीवंतपणा प्राप्त झाला आहे. देहामध्ये चैतन्य तेजरूपाने, वायुरूपाने, उष्णतेच्या रूपाने भरून राहिले आहे म्हणून हे शरीर उबदार लागते. (१)

असा हा जीव चैतन्याच्या साक्षात्कारासाठी साधन करू लागतो. जीवनाच्या रामकृष्णगतीवर आरूढ होऊन शब्द-अशब्दाचा असार पसारा बाजूस सारून सहस्त्रदळी महाकारणदेहात म्हणजेच चिदाकाशात प्रवेश करतो. तेथे पीतप्रभेच्या म्हणजेच आत्मप्रकाशाच्या तेजाने चिदाकाश व्यापून उरलेले असते. या पीतप्रभेमध्येच नीलप्रकाशयुक्त सूक्ष्म ज्योतीचा अनुभव येतो. रामकृष्णगती जेंव्हा पीतप्रभायुक्त आत्म्यामध्ये अखंड मिसळत राहते तेंव्हा ब्रह्मवाचक ओंकाराचा नाद दुमदुमत राहतो. सर्व विश्वामध्ये भरून राहिलेले हे चतुर चैतन्याचे वारे या दासरामाच्याही ठिकाणी स्थित आहे. (२ ते ५)

**११) अभंग :**

**वारे भरले या नयनात ।।धृ ।।**
**नादश्रवणी तदाकारता। एकचि अखिल जगात ।।१ ।।**
**मागे शून्य पुढती शून्य। आहे कोण तयात ।।२ ।।**
**लक्ष्यालक्ष्य गुणी तो जाला। नटला नामरुपात ।।३ ।।**
**दासरामी हा सगुण निर्गुण। संतांचे स्मरणात ।।४ ।।**

**विवरण :**

सर्वत्र केवळ चैतन्यच भरले आहे अशी ज्ञानदृष्टी जेंव्हा प्राप्त होते, तेंव्हा बाह्य सृष्टीमधील जड-चेतन अशा द्वंद्वात्मक ज्ञानाचा निरास होतो. अशी ज्ञानदृष्टी जेंव्हा अखंडत्वाला प्राप्त होते तेंव्हा त्याला 'नयन' म्हणतात. अशावेळी चैतन्याचे वारे भरलेल्या चिदाकाशाचा परिपूर्ण नयन होतो. सर्व जगतात हे चैतन्य नादरुपाने भरून राहते. जीव या नादश्रवणाशी तदाकार होऊन जातो. (१)

चिदाकाशाच्या अलिकडे कारणदेहाचे शून्य असून चिदाकाशाच्या पलिकडे नि:शब्द, निश्चळ अवस्थेचे महाशून्य आहे. अशा तऱ्हेने मागे व पुढे अशा दोन्ही ठिकाणी असलेल्या शून्यावस्थेत केवळ चैतन्यच आहे. फरक केवळ अवस्थामधील आहे. (२)

सुवर्ण अनेक दागिन्यांचे असले तरी ते सुवर्णच असते, तसे नामरूपात्मक असे हे जगत् म्हणजे चैतन्याचे विविध अंगाने नटणेच होय. लक्ष्य वस्तू असलेले नामरूपात्मक जगाच्या ठिकाणी व नामरुपातीत अशा अलक्ष्य वस्तुच्या ठिकाणी, शुध्दसत्वात्मक गुणाच्यायोगे केवळ चैतन्याचाच अनुभव येतो. (३)

देहरूपात होणारे संतांचे सगुण रुपातील दर्शन आणि चैतन्याशी एकरुप झालेले त्यांचे निर्गुण स्वरुपातील दर्शन यामध्ये भिन्नता नाही. अशा संतांच्या स्मरणात त्यांच्या सगुण आणि निर्गुण अशा दोन्ही स्वरुपाचा अनुभव दासरामाला येत आहे. (४)

**१२) अभंग :**

**तेजाचा बंबाळ झगटला तेजाचा बंबाळ।**
**पीतप्रभा ही अग्नीच विखुरे पसरे इंदु ज्वाळ।।१।।**
**पीत धवळले श्यामची जहाले शीतल बहु तेजाळ।**
**श्यामापासून श्वेत निघाले सप्तकिरण बहु ढाळ।।२।।**
**शीत उष्ण ही आभा पसरली नभासी व्यापी रसाळ।**
**जीवनरस हा जेथुनी ओते नभी आत्माची दयाळ।।३।।**
**वायु गतिगुणे नामरुपाचे विस्तारले जंजाळ।**
**चंचळ गुण हा शब्दापासुनी नादरहित मवाळ।।४।।**





**निश्चळ आत्मा डहळुनी गगना आलासे कनवाळ।**
**वायुरुपाने तोची प्रगटला थोर महत्तम काळ।।५।।**
**तेथ लावुनी वृत्ती राहू सगुणची वंदू सुभाळ।**
**प्रकाशवी जो तिही लोका करोनिया प्रतिपाळ।।६।।**
**दासराम हा तेथ विनटला खपुष्प हा तेजाळ।**
**कृपा करील तरी बुध्दी प्रकाशवी धन्यची तो गोपाळ।।७।।**

**शब्दार्थ :**

(१) विनटणे - तल्लीन होणे, रमणे. (२) बंबाळ - मोठा प्रकाश
(३) झगटणे - घासणे. (४) डहळून - ढवळणे (५) ढाळ - प्रकार

**विवरण :**

चिदाकाशामध्ये नादतेजाचा प्रकर्ष असून तेथील प्रकाशाच्या घर्षणाने पीतप्रभेचा लखलखाट होतो. त्या पीतप्रभेच्या अग्निज्वाळा मात्र चंद्रकिरणाप्रमाणे थंड असतात. बहु तेजाळ परंतु शीतळ अशी पीतप्रभा ढवळली जाऊन त्यापासून श्याम, श्यामापासून श्वेत व श्वेतापासून पुढे सप्तरंगांची प्रभा अनेक प्रकाराने पसरते. (१-२)

शीतउष्णाची रसाळ आभा चिदाकाशात व्यापली जाऊन तेथूनच दयाळू आत्मा जीवासाठी जीवनरस ओततो. चिदाकाशातील नादरहित शब्दतत्वामध्ये चंचळत्वाचा गुण असतो. त्या चंचळ गतीरूप चिद्वायुमुळे नामरुपाचे जंजाळ विस्तारले आहे. ते निश्चळ आत्मतत्व स्पंदरुपाने ढवळले जाऊन जीवासाठी कनवाळूपणे चिद्गगनरूप झाले आहे. हा चिद्वायूच काळरुपाने प्रगट झाला आहे. (३-५)

तिन्ही लोकांना प्रकाशित करून त्यांचा सांभाळ करणाऱ्या सगुण

आत्मसत्तेच्या ठिकाणी वृत्तीला स्थिर करून, वंदन करुया. अशा तऱ्हेने कृपेअंती बुध्दीला प्रकाश देणाऱ्या गोपाळरूप आत्म्याच्या पायी धन्यता मानून चिदाकाशातील तेजस्वी आत्मपुष्पासोबत हा दासराम रमला आहे. (६-७)

**१३) अभंग :**

**विश्व मालिकेचा ठसा अणू हाची काय ।**
**नादभरे गाजे आत्मा पवनात काय ।।१ ।।**
**अहा फिरती विद्युत्कण हे वायूमध्ये काय ।**
**तया केवी गती झाली चंचळ हे काय ।।२ ।।**
**पूर्ण ब्रह्म शून्यरूप विकासले काय ।**
**चिदांशु हा पूर्ण स्वरुपी परिपूर्ण काय ।।३ ।।**
**सदानंद ते उत्क्रांती जीवनात काय ।**
**पूर्ण जगज्जीवन वायू गगनात काय ।।४ ।।**
**तेज आप विभक्ती करणे वायू दावी काय ।**
**उष्ण शीत तोची झाला मूळ शांत काय ।।५ ।।**
**गगन हे जेथुनी जाले निश्चळ ते काय ।**
**निश्चळीच चंचळ लाटे अणु रेणु काय ।।६ ।।**
**अणु रेणु अंतश्चक्षू दावी हेची काय ।**
**अणु रेणु जीवनी झाले जीवनात काय ।।७ ।।**
**जीवन हे अणूचे ठायी चक्षुरूप काय ।**
**दासरामी पहाता तेथे हरीरूप काय ।।८ ।।**





**विवरण :**

चैतन्याचे ठिकाणी विश्वाचे सहज स्फुरण आहे. अनंत विश्वांचा ठसा उमटविण्याचे सामर्थ्य एका चिद्अणुच्या स्पंदामध्ये आहे. जेथे स्पंद आहे तेथे गती आहे, चंचळत्व आहे. त्या चंचळाच्या गतीमध्ये अनेक तेजोकण फिरत असून त्यांची हालचाल म्हणजे चैतन्याचीच हालचाल होय. गतीरूप, वायुरूप चैतन्य प्राणरुपाने सर्वत्र असून प्राणामधील नादगर्जना सर्वत्र भरून राहिली आहे. (१-२)

शून्यरुपाची विकसीत अवस्था व चिदांशाची पूर्ण स्थिती म्हणजे परिपूर्ण ब्रह्मस्वरुप होय. हे ब्रह्मस्वरुप नि:शब्द, निश्चळ निरंजन आहे. सत् तत्वाचा आनंद हा स्थिर/शाश्वत/नि:शब्द/निश्चळ असून तो चिरकाळ टिकणारा आहे. उर्ध्वगतीने जीवन उत्क्रांत होऊन चिद्वायू चिद्गगनामध्ये अखंडत्वाने मिसळू लागतो तेव्हा असा आनंद होतो. (३-४)

मुळामधील पूर्ण शांत, निश्चळ तत्वापासून निर्माण झालेल्या चिदाकाशात चिद्वायूच्या घर्षणाने शीत व उष्ण तेजे निर्माण होतात. उष्णतेने शीत तत्वाची वाफ होऊन पाण्यात रुपांतर होते. अशा तऱ्हेने पुढील सर्व घटक विभक्त होतात व पंचमहाभूते निर्माण होऊन सृष्टीनिर्मिती होते. (५)

निश्चळ तत्वातील चैतन्य लहरी प्रवाही होऊन चिद्गगन-चिदाकाश निर्माण होते. या चंचळ लहरींच्या लाटेमध्ये चिद्वायूचे अणु-रेणू प्रवाहीत होऊन त्यांच्या संकोच-विस्ताराने विश्व आकारते. (६)

चिदाकाशातील शीतल तत्व हेच जीवाचे जीवन असून याच जीवनकलेवर बाह्य जीवन चालू असते. या जीवनाच्या गतीमध्ये चैतन्याचे अणुरेणू असतात. साधनेने अंत:चक्षु प्राप्त होताच याच चिदाणूंचा प्रकर्ष होऊन साक्षात्कार होतो. (५ ते ७)

उर्ध्वगामी जीवनात स्पंदरूप अणूचा प्रज्ञाचक्षू जेव्हा विश्वरूप होतो, तेथे दासरामालाही सर्व विश्व हरीरूपात दिसू लागते. (८)

**१४) अभंग :**

**ध्यास लागला वाऱ्याचा। ग्रास जाहला गगनाचा।।धृ।।**
**वाऱ्यापोटी हे गगन। सांडूनी भेटे आपण।।**
**वायु डहुळला। गगनी आला।**
**नादरूप अनुभव त्याचा।।१।।**
**गगनी व्यापिला नादगुण। तेथ दाविले द्वैतपण।**
**उगम जाहला द्वैताचा।।२।।**
**बहुता शक्ती वाऱ्याअंगी। नामरुपगुण दावित संगी।**
**देई मोद हा आत्म्याचा। दासराम लंपट त्याचा।।३।।**

**विवरण :**

चैतन्याच्या वाऱ्याचा जेंव्हा ध्यास लागतो, तेंव्हा चिद्गगनाचा ग्रास होतो आणि आपल्याच ठिकाणी असलेल्या वायुरूप चैतन्याची भेट होते.

निश्चळापासून उत्पन्न झालेल्या चिदाकाशातील लहरी म्हणजे चैतन्य होय. चंचळत्वाच्या गुणे तेथील चैतन्य डहुळले जाते. त्यामुळे तेथे अनाहताचा अनुभव येतो. (१)

नादगुणानी व्यापलेल्या चिद्गगनापासून द्वैताचा उगम होतो. (२)

चिद्गगननामधील-चिदाकाशामधील चैतन्याच्या वाऱ्याअंगी असलेल्या अनंत शक्तीमुळे पुढे नामरुपगुणांचा आविष्कार होतो.

अशा तऱ्हेने आनंद देणाऱ्या वायुरूप आत्म्याचा ध्यास लागून हा दासराम तेथेच आसक्त होऊन राहिला आहे. (३)





**१५) अभंग :**

**श्वेत श्याम दोनी। चिद्गुणे या निरंजनी।।१।।**
**एक उष्ण एक थंड। दावी द्वैताचे कवाड।।२।।**
**वारियाचा खेळ। वाहे निश्चळी चंचळ।।३।।**
**चैतन्याची प्रभा। घन निश्चळी स्वयंभा।।४।।**
**दासरामी हा सिध्दांत। अवघा आत्माराम संथ।।५।।**

**विवरण :**

मूळ सत् निश्चळ चिद्वायु तत्वालाच निरंजन म्हणतात. ते घन असून सर्वव्यापी आहे. त्या गतीमान सत्वायूत चिद्गुणाच्या योगे चंचळाच्या लहरी उठतात आणि तेथूनच द्वैताचे कवाड उघडले जाते. या चैतन्यलहरींच्या प्रवाहामधील पोकळीलाच चिदाकाश म्हणतात. या चैतन्यलहरींच्या प्रवाहापासूनच श्वेत, श्याम, उष्ण, शीत ही द्वैताला प्रेरणा देणारी तत्वांची बीजे चिदाकाशात निर्माण झाली. (१-२)

चिद्वायुतील शीतभागाचे जडरुपाने पाणी झाले. पाण्यास स्थिरता येऊन त्यास पृथ्वीरूपता आली. उष्ण भाग हलका म्हणून सूक्ष्म आहे. त्याने तेजाचे, अग्निचे रूप धारण करून अखेर वायुरूपाने तो आकाशात वाहू लागला. अशा तऱ्हेने पंचमहाभूते निर्माण झाली. श्वेतश्याम रंगरुपाने विश्व आकारास आले. सबब आकार म्हणजे रंग आणि रंगरहित जे जे तेच निराकार सत्ब्रह्माचे स्वरुप होय.

घननिश्चळ चिद्वायुप्रभा स्वयंभू असून अशा निश्चळाच्या अंगावरती उठणाऱ्या चंचळाच्या लहरी हा त्या चिद्वायुचा म्हणजेच चैतन्याच्या वाऱ्याचा खेळ होय.

या दासरामाच्या ठिकाणी असलेले हे आत्मारामरुपी निश्चळ तत्व अवघे विश्व व्यापून उरले आहे. (३ ते ५)

**१६) अभंग :**

**अशब्द हा सिंधू। तेथ लहरी पैरा शब्दू।।१।।**
**न दावी जे नादा। ताल सूर रस छंदा।।२।।**
**शब्द चंचळ चंचळ। शीत उष्णत्वे तेजाळ।।३।।**
**वारियाने विश्व प्रगट। दासरामी या निघोट।।४।।**

**शब्दार्थ :** पैरा - पहरावणे, व्यापणे.

**विवरण :**

चिदाकाशातील चैतन्याच्या लहरीमध्ये सृष्टीनिर्मितीसाठी लागणाऱ्या तेजाची शीत, उष्ण तत्वे तसेच चंचळ शब्दतत्व बीजरुपाने असते. येथील चैतन्याच्या लहरींच्या योगाने हे विश्व प्रकट झाले आहे.

या चिदाकाशापासून प्रस्फुट गगन म्हणजेच अशब्दस्थिती निर्माण होते. या ठिकाणी शब्द, दृश्य नसते. सृष्टीतील संघाताच्यायोगे होणारे ताल, सूर, छंद या सारखे नादही नसतात. ही अशब्दस्थिती पुढील स्थूल आणि सूक्ष्म देहाचे कारण आहे. अशा अशब्द स्थितीच्या सिंधूपासून पुढे शब्द/दृश्य यानी व्यापलेल्या स्थूल आणि सूक्ष्म देहाचा विस्तार झाला आहे. अशा तऱ्हेने स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण देहामध्ये केवळ चैतन्याचाच विस्तार आहे.

हा दासरामदेखील अशा या अत्यंत शुध्द, निघोट चैतन्याशी समरस होऊन राहिला आहे. (१ ते ४)





**१७) अभंग :**

**उघडिया डोळा अंधार दडाला। दृष्टीपुढे आला झाकिलिया।।१।।**
**शून्याचे माझारी संकल्प निमाला। तेथ तो लोपला सूर्य चंद्र।।२।।**
**जाणीव नेणीव हरपली जेथे। प्रकाश ना तेथे अंधारु गा।।३।।**
**ब्रह्माचे घनत्व अंतर्बाह्य दृष्टी। अभेद्या त्रिपुटी उरली नाही।।४।।**
**शून्याचिये पैल निजत्व स्मरण। नुरे विस्मरण एकाएकी।।५।।**
**मावळवी जो का विश्वाचा आभास। नवल प्रकाश निजत्वाचा।।६।।**
**देखणा होवोनी देखता अलिप्ती। दासराम प्रीती करी तेथे।।७।।**

**शब्दार्थ :** माझारी - आत, मध्ये.

**विवरण :**

आपण डोळे झाकले की डोळ्यापुढे अंधार होतो व डोळे उघडताच अंधार दूर होऊन प्रकाश दिसतो. तसेच महाशून्यरूप सत्ब्रह्म जेंव्हा डोळे मिटून ध्यानस्थ होते, त्याचा सृष्टीसंकल्प विरून जातो, तेंव्हा महाप्रलय होऊन सर्व सृष्टी नाहीशी होते. चंद्रसूर्य लोपले जातात. जाणीव-नेणीव, प्रकाश-अंधार असे काहीही उरत नाही. त्या घन अशा सत्ब्रह्माच्या ठिकाणी दृष्टी अंतर्बाह्यपणे अभेद्य, निश्चळच झाल्याने त्रिपुटीही नसते. तेथे केवळ सत्वायूचा गोळा स्वयंप्रेरणेने स्फुरण पावत असतो. अशा सत्ब्रह्माचे ध्यानावस्थेतून उत्थान होताच झाकलेला डोळा उघडला जातो. निजत्वाचे स्मरणाने तो 'आत्मवान' होतो आणि त्याने केलेल्या विश्वसंकल्पाबरोबरच हे सारे विश्व प्रकट होते. (१ ते ५)

साधनेमध्ये निश्चळ द्रष्टा होऊन अलिप्तपणे स्वत:सच पाहिले असता निजत्वाचा नवलप्रकाश प्रकट होतो. या विश्वाच्या सत्यतेचा आभास मावळतो. ज्ञानदृष्टीने सर्वत्र चैतन्याची अनुभूती येते. या दासरामाला अशा चैतन्याच्या ठिकाणी अत्यंत प्रीती वाटते. (६-७)

**१८) अभंग :**

**शब्द आकारिले विश्व । सर्व घटी समभाव ।।१ ।।**

**उष्ण शीत आभा । अरूप आकारिला नभा ।।२ ।।**

**वायु-आकाशीची गाठी । तेणे आत्मा हृदयपुटी ।।३ ।।**

**हृदयी हरीचे भजन । दासरामी समाधान ।।४ ।।**

**विवरण :**

चिदाकाशातील नादरहित 'शब्द' तत्वापासून अनाहत नाद उत्पन्न होऊन त्यापासून हे सारे विश्व आकारास आले आहे. हा नाद विश्वात सर्व ठिकाणी भरून उरला आहे. विश्वामध्ये सर्वा घटी तो समत्वभावाने व्याप्त आहे. (१)

चिदाकाशापासून बनलेल्या प्रस्फुट गगनामध्ये अरूप अशी शीत, उष्ण, तेजे साकार होऊन पुढे भूताकाश निर्माण होते. भूताकाशापासून पंचमहाभूते निर्माण होऊन जड सृष्टी आकाराला येते. (२)

आकाश आणि चिद्वायू यांची मिळणी झाली की आत्मा देहामधील शिरोहृदयात प्रवेश करतो व जीवदशेस येतो. अशा तऱ्हेने जड व चेतन सृष्टीला समभावाने केवळ चैतन्याचेच अधिष्ठान आहे. (३)

ज्या हृदयात निश्चळ हरी स्थित आहे, त्याचे निरंतर भजन केल्याने दासरामाला अत्यंत समाधान प्राप्त झाले आहे. (४)





**१९) अभंग :**

**आदी वारे अंतीही म्हणुनिया ते गगनात ।।धृ ।।**

**गगनीची लहर । शब्दाची बहर ।**

**शांततेने पाहता हरिनाद कसा पवनात ।।१ ।।**

**हरी आला हरी आला श्रवणात या ।**

**या हो नयनात या । नयनाचा विज्ञान डोहो पहा ।**

**दासरामी एक ते हरिनाम अहा गगनात ।।२ ।।**

**विवरण :**

हे चैतन्याचे वारे विश्वाच्या आधीही होते आणि त्याच्या विलयानंतरही ते नित्य राहणारे आहे. असे हे अनादिसिध्द अखंड व अनंत चैतन्यवारे चिद्गगनामध्ये पसरलेले आहे. चिदाकाश ही तुर्यावस्था होय. नि:शब्द तुर्यातीत अवस्थेला 'हरी' असे म्हणतात. साधनमार्गाने जाताना हरीच्या साक्षात्काराच्या खुणा दिसू लागतात. पिंडाच्या चार देहाच्या निरसनानंतर प्राप्त होणाऱ्या शांत अवस्थेत उर्ध्वगामी जीवनाच्या गतीची वायुरूप लहरीशी म्हणजेच प्राणाशी गाठ पडते. अशा वेळी पवनात घुमत असलेले चैतन्यरूप हरीनाम म्हणजे अनाहतनाद श्रवणात ऐकू येऊ लागतो. या श्रवणाचाच डोळा बनतो. अज्ञानाचा निरास होऊन ज्ञानदृष्टी प्राप्त होते. ही ज्ञानदृष्टी साक्षीचैतन्य प्रज्ञाचक्षुशी एकरूप होऊन अखंडत्वाला प्राप्त होते. अशा ज्ञानदृष्टीला नयन असे म्हणतात. हा नयन म्हणजे विज्ञानरूप डोह आहे. म्हणजेच तो नेणीवरूप आहे. तो ज्ञानप्रत्यक्ष आहे .पहाणेपणाच्या ज्ञानाची जाणीव तेथे नाही. दासराम अशा चिद्गगनातील हरिनामाशी एकरूप होऊन राहिला आहे. (१-२)

**२०) अभंग :**

**वारा पाहता जगी संचरला । बहुत शक्तीने स्वरुपी चमकला ।।१ ।।**
**चेत अचेता अस्ति भाति प्रिय । आकर्षण गुणी जगी उदेला ।।२ ।।**
**पहाता एकची परी दोन दिसे । अघटित शक्ती अघटित लीला ।।३ ।।**
**शब्दगुणे आकाश दाविले । सगुण-निर्गुण होऊन ठेला ।।४ ।।**
**गगन जहाले चिद्‌गुणयोगे । निश्चळी चंचळ वायुच झाला ।।५ ।।**
**चंचळ जरी का स्थिरता पहाले । निश्चळ आत्मा संती आतुडला ।।६ ।।**
**आत्मरुपाची लाट वायू हा। अहंभाव हा जेथ बुडाला ।।७ ।।**
**दासराम हा निवांत करुनी । गुरु दाविती हा वायुच नटला ।।८ ।।**

**शब्दार्थ :** आतुडणे - गवसणे, सापडणे.

**विवरण :**

स्वरुपाच्या ठिकाणी शक्तीरुपाने विलसणारे हे चैतन्याचे वारे विश्वामध्ये चेतन व अचेतन अशा सर्व ठिकाणी संचरून आहे. हीच चैतन्याची स्वरुपशक्ती देहात सहस्रदळी तेजोरूपाने चमकत असते. हे सच्चिदानंद आत्मरूप जगतामध्ये अस्ति, भाति, प्रिय रुपाने प्रचितीस येते. हे सर्व जगत म्हणजे चैतन्याच्या आकर्षण शक्तीचा विलास आहे. मुळात अद्वैत, अभेदपणाने असूनही जीवाला अज्ञानामुळे होणारा द्वैतपणाचा अनुभव हे त्याच्याच शक्तीचे स्वरुप होय. ही त्याचीच अघटित अशी लीला आहे. निश्चळातील चंचळत्वामधील चिद्‌गुणाच्यायोगे चिद्‌गगन/चिदाकाश निर्माण झाले. चिदाकाशाच्या योगे 'शब्द' गुण आणि तत्वे निर्माण झाली. चैतन्य हे निश्चळ ही आहे तसेच ते चंचळही आहे. चैतन्य निश्चळ आहे म्हणजे ज्यातील चंचळत्व फार फार सूक्ष्म आहे. याचा अर्थ निश्चळ व चंचळ ही दोन्ही चैतन्याची तत्वे आहेत. निश्चळ चैतन्य 'निर्गुण' तर चंचळ चैतन्य





'सगुण' होऊन राहिले आहे. म्हणजेच सगुण व निर्गुण ही दोन्ही त्याचीच रूपे आहेत. अशा या चंचळामध्ये ज्यानी निश्चळता साधली अशा संतांना तो निश्चळ आत्मा गवसला आहे. (१ ते ६) साधनेने आत्मस्वरुपाच्या ठिकाणच्या चैतन्याच्या लाटेशी समरसता साधली जाते तेव्हा अहंभावाचा संपूर्ण नाश होतो.

सद्‌गुरु या दासरामाला निवांत/निश्चळ करून सर्वत्र चैतन्यच नटलेले आहे असा अनुभव देतात. (७-८)

**२१) अभंग :**

**अवचित नभी या वारा । दिव्य सारा भव उतारा ।।१ ।।**
**विद्युत्कण तो विश्वाकारा । अवयव भवने बहुती ।**
**आदी अंती व्याप्त सारा ।।२ ।।**
**रामकृष्णी हा चिद्‌गुण वारा । अचिद निराळा वाहे ।**
**गगनी वाहे चातुरा ।।३ ।।**
**तेज आप धृती परमाणु बरा ।**
**दासरामी जो तो हा आत्मगेहा रे उदारा ।।४ ।।**

**शब्दार्थ :**

(१) उतारा - सोपा मार्ग (२) विद्युत्कण - वीज (३) धृती - धरणी
(४) गेह - घर, गृह (५) धाला - तृप्त, संतुष्ट.

**विवरण :**

अनादिसिध्द असे हे चैतन्याचे वारे अखंड, अनंत अशा चिद्‌नभामध्ये व्याप्त आहे. आकाशात वायु जसा सहजगत्या, आकस्मिकपणे स्फुरण पावतो

तसा चिदाकाशामध्ये हा चैतन्याचा दिव्य पसारा सहजपणे पसरला आहे. विद्युत्कण म्हणजे तेजबिंदू. हे तेज म्हणजे निजत्व होय किंवा त्याला निजत्वाचे तेज म्हणता येईल. ही सारी सृष्टी त्या तेजाचा सहज आविष्कार आहे. त्यापासूनच ही सृष्टी आकारास आली. विश्वाच्या आदिअंती व्याप्त असलेले हे चैतन्य अनेक अवयवांनी विश्वात साकार झाले आहे. (१-२)

सर्वव्यापी चिदाकाशातील हा चतुर वारा सजीवांच्या ठिकाणी असलेल्या जीवनाच्या रामकृष्णगतीमध्ये चिद्‌गुणाच्या योगे व्याप्त आहे. तसेच हे वारे अचिद्/जड अशा ठिकाणी देखील सत्तासामान्यत्वाच्या योगे स्पंदरुपाने भरलेले आहे. हे चैतन्य पृथ्वी, आप, तेज इ. स्थूल पंचमहाभूतामध्ये जसे व्याप्त आहे तसेच ते परमाणुमध्येही आहे.

या दासरामाच्या ठिकाणी आत्मगृहामध्ये तेच वारे उदारपणे व्याप्त आहे. (३-४)

**२२) अभंग :**

**मन चोर हरी या शरीरी वास जो करी ।**
**नटरंग करुनी दावी परी बहु तयापरी ।।१ ।।**

**या जगिया भरुनी उरी खेळी तरी ।**
**सत्ता ही नवल परी येईना सरी ।**
**हेमची गुण नामरुपा जेवी अकारी ।**
**तै आत्मा हा विकसित तनु उपरी अंबरी ।।२ ।।**

**परमाणूपासूनिया व्याप्त अंतरी ।**
**चिद्‌गुण हा चाळवी जो या दिगंतरी ।**





**नरनारी होवुनिया खेळ जो करी ।**
**या आवडीने भेद करुनी स्वस्थ श्रीहरी ।।३ ।।**

**भेद कुठे आत्मरूपी पहाता तरी ।**
**भेद जसा लाटेपरी पाणियावरी ।**
**एकतत्व चैतन्यची बीज अंकुरी ।**
**जे विकसुनिया आणि फळा सत्य माधुरी ।।४ ।।**

**सत्वर ही मती विचारी गुंग जो करी ।**
**निर्विकारी वेड लावी सत्य अंतरी ।**
**निर्गुण गुण या लहरी आत्मसागरी ।**
**हा दासराम आत्मरुप सदयता जरी ।।५ ।।**

**शब्दार्थ :**

(१) उरी - बाकी, शिल्लक रहाणे (२) सरी - बरोबरी, तुलना.

**विवरण :**

ज्याप्रमाणे एखादा कुशल नट आपल्या विविध कलारंगांचे आविष्कार करीत असतो, तसे हा परमात्मा हरी या शरीरात गुप्तरुपाने राहून मनाच्या योगे विश्वातील विविध रंग दाखवितो. (१)

विविध आकारात असलेल्या सोन्याच्या दागिन्यांमध्ये जसे एकच एक सोने असते तसे तो चैतन्य आत्मा सत्तासामान्यरुपाने विविध आकारात जगात सर्वत्र भरून दशांगुळे उरला आहे. त्याच्या या नवलाईच्या खेळाला उपमा नाही.(२)

हे चैतन्य सर्वत्र व्याप्त असले तरी देहामधील चिदाकाशात त्याचे विकसीत रूप दिसून येते. हे चैतन्य सूक्ष्म परमाणूमध्ये तसेच सर्व दिशांना व्याप्त

आहे. चिद्‌गुणाच्या योगे तो श्रीहरी स्वत:च्या आवडीसाठी नर-नारी असा भेद करून त्यांचा खेळ पहात स्वस्थ आहे. (३)

जसे पाण्याची लाट वेगळेपणाने भासत असली तरी त्यामध्ये केवळ पाणीच असते, तसेच अज्ञानीदृष्टीला विश्वामध्ये भेद दिसत असला तरी ज्ञानदृष्टीने/आत्मरुपाने पहाता अभेदच दिसतो. चैतन्याचे बीज अंकुरून, ते वाढून त्याला मधूर फळे यावीत तसे आत्मा विश्वरुपाने विकास पावून बहरतो आहे. (४)

विचार आणि विकारांच्या पलिकडे असलेल्या या आत्म्याचा खेळ वेड लावून गुंग/स्तंभित करून टाकणारा आहे.

सगुण निर्गुणाच्या रुपाने आत्मसागरावरील या लहरी दयाळूपणाने या दासरामाच्या अंतरीही खेळत आहेत. (५)

**२३) अभंग :**

**वायुलहरी या होऊनी ठेल्या वायुस्वरुपाकार ।**
**तरी गा तेची स्मरण त्यांचे वायूचा झणकार ।।१ ।।**
**वायू दावितो नानापरी ते दृष्टिविकार आकार ।**
**विश्वपसारा त्याचे ठायी जन्ममरण अपार ।।२ ।।**
**ज्ञानाज्ञाना तोची कारण चालवितो व्यवहार ।**
**परमार्थाचे अधिष्ठान तो तेची सारासार ।।३ ।।**
**हलके आणि जड उष्ण थंड ते खरखरीत मऊ फार ।**
**तिखट आंबट खारट तुरट गोड दावी पारापार ।।४ ।।**
**सकळ संतही त्याची रुपे परम भक्ती अनिवार ।**
**हृदयी खेळतो दासरामी अनस्यूत अरुवार ।।५ ।।**





**शब्दार्थ :**

(१) अपार - अमर्याद (२) अनस्यूत - ओवलेले, सुत्रबध्द

(३) अरुवार - हळुवार, मृदु.

**विवरण :**

मूळ निश्चळ सत्घन तत्वात जाणीवरूप चिद्‌वायु होता. तेथे जाणीवरुप चैतन्याच्या म्हणजेच चिद्‌वायुच्या लहरी उठल्या. या लहरी म्हणजे चैतन्याचे स्वरुपच होय. हे स्वरुप नादप्रकाशयुक्त आहे. या चिद्‌वायूचा झणत्कार म्हणजे त्याच्या नादाचे श्रवण म्हणजेच त्या निश्चळ परमात्म्याचे स्मरण होय. (१)

या वायुलहरी म्हणजे विश्वलहरी आहेत. सृष्टीच्या सापेक्ष अवस्थांचा अनुभव आत्म्यामुळे आहे. चैतन्य प्रकट होऊन आत्मज्ञान झाले की सृष्टीचा/दृश्याचा लय होतो. तेच चैतन्य आकसले/लपून राहिले की अज्ञान अवस्था प्राप्त होऊन दृष्टीला सृष्टीतील नाना आकारांचा/विकारांचा अनुभव येतो. अर्थात ही सृष्टी चैतन्याच्या अंगभूत आहे. आत्मज्ञानासाठी लागणाऱ्या परमार्थातील सारासार विचारांचे अधिष्ठान देखील चैतन्यच आहे.

पदार्थाचे जडत्व, हलकेपणा, उष्ण-थंड, खरखरीत-मऊ, तिखट-आंबट हे सर्व अनुभव त्याच्यामुळेच आहेत. थोडक्यात म्हणजे सृष्टीतील पदार्थाचे स्थित्यंतर, रुपांतर, अवस्थांतर, जन्म-मरण यांच्या येणाऱ्या विविध प्रकारच्या अनुभवाच्या मागे चैतन्याचेच अधिष्ठान आहे. (२ ते ४)

ज्यांचे ठिकाणी चैतन्याची परमभक्ती अनिवारपणे केली जाते असे सर्व संत हे वायुलहरीचीच रूपे होत. या दासरामाच्या हृदयामध्येही त्याच वायुलहरी गोवल्या असून त्या अत्यंत हळुवारपणे तेथे खेळत आहेत. (५)

२४) अभंग :

**वारा वारा वारा जगी सारा जीवाधारा पोरा ।।धृ ।।**

**आत्मा निश्चळ वारा । चिदाचिदातू पसारा ।**
**पावे निर्गुण विस्तारा ।।१ ।।**

**रामकृष्ण हरी गाजे । दुर्लभ सुरलोका जे ।**
**मस्तकी बुध्दी विराजे जे ।।२ ।।**

**निर्गुणी झाले सगुण । रामकृष्णी हे गगन ।**
**दासरामी चिद्घन पूर्ण ।।३ ।।**

**शब्दार्थ :**

(१) सूरलोक - देवलोक (२) विराजे - शोभणे, प्रकाशणे
(३) गाजे-दुमदुमणे, गर्जना होणे.

**विवरण :**

निश्चळ निर्गुणाच्या ठिकाणी सूक्ष्मतम चंचळ चिद्वायुची गती आहे. या गतीरूप चिद्वायुंच्या लहरींनाच चैतन्य म्हणतात. चैतन्याच्या या वाऱ्यापासून विश्वाची उत्पत्ती झाली. जगाबरोबर जीव आले. वाऱ्याच्या आधारामुळे जीव आहेत. निश्चळ निर्गुणाचा विस्तार म्हणजे हे विश्व व हे विश्व म्हणजे चिदाचिदांचा सगुण रुपातील पसारा होय. निश्चळ निरंजन तत्व गुणातीत आहे आणि ते निरपेक्षपणे गुणातीत आहे हे सांगण्यास त्याला 'निर्गुण' म्हटले आहे. (१)

निश्चळ चैतन्यरूप परमात्मा सत्तासामान्यत्वाने सर्वत्र असतो. निश्चळ नि:शब्द हरीरूप हे त्या शरीरातील चंचळ आत्म्याचाही आत्मा आहे. तेच चैतन्य देहामध्ये चिदाकाशात चंचळ आत्मरूपाने असते. चिदाकाशात आत्मबुध्दीच्या





प्रकाशात ऐकू येणारा अनाहत नाद म्हणजे रामकृष्णहरी या नामाची गर्जना होय. येथील आनंद देवलोकानाही दुर्लभ आहे. (२)

निर्गुण चिद्घनापासून सगुण चिद्गगन/चिदाकाश निर्माण झाले. तेथे 'रामकृष्णवाचा' हा ज्याचा आत्मा आहे त्या शिवाचा अनुभव येतो.

दासराम अशा चिद्घन नि:शब्द पूर्णावस्थेत निमग्न आहे. (३)

२५) अभंग :

**वारा पाहिला कोणी वारा पाहिला ।**
**विश्वव्यापी पहाया त्या कोण वेगळा ।।१ ।।**

**लवलवीत पालवीतून कुठे सुटला ।**
**जीवनात जीवन वाहे जीवी जागला ।।२ ।।**

**मायबाप या जगताचा जीवना आला ।**
**समाधान दे चित्ताला रिझवी मनाला ।।३ ।।**

**विचारात जो का लपला दावी मनाला ।**
**तोची मरणी शांती देई मोदवी तुला ।।४ ।।**

**नामरुपी तोची नटला भाव वेगळा ।**
**डहुळ जरी स्थिरता पहाला वृत्ति निराळा ।।५ ।।**

**हाची धर्मपंथ आमुचा एक एकला ।**
**आतवरी एकी एकची एकी मिसळला ।।६ ।।**

**दासराम या दैवता शरण रिघाला ।**
**शिरावरी तेणे माझा भार घेतला ।।७ ।।**

**शब्दार्थ :**

(१) रिगणे – येणे (२) डहुळ – ढवळणे.

**विवरण :**

निश्चळामध्ये उत्पन्न झालेले पहिले चैतन्याचे वारे कधी कोणी पाहिले आहे काय ? हा वारा विश्वाला व्यापून राहिला आहे. त्यामुळे जो पाहणारा व जे पहावयाचे ते सर्व वारेच आहे. त्यामुळे चैतन्याचे वारे वेगळेपणाने पहाणे उरतच नाही. (१)

लवलवीत पालवीतून तसेच जीवाचे जीवन बनून वाहणारे, जलात असणारे चैतन्य म्हणजे जगताचे जीवन असून तेच खरे मायबाप आहेत. या चैतन्यामुळेच मन रिझवले जाऊन चित्ताला मोठे समाधान मिळते. (२-३)

जो सारासार विचारात लपून मनाचे यथार्थ स्वरुप दाखवितो, तोच ते मन मारून उन्मन करून मृत्यूसमयी जीवाला शांत करून आनंद प्रदान करतो. (४)

नामरूपाने नटून आपणच विश्व झालेल्या वाऱ्याकडे पाहताना कांही वेगळाच भाव दाटून येतो. परंतु चैतन्यामधील घुसळणीने अस्थिर भासणाऱ्या या विश्वाकडे साक्षिवृत्तिने पाहू जाता त्याच्या स्थिरतेचा निराळाच प्रत्यय येतो. (५)

आत्मा हाच आमचा धर्म असून त्याचे नाम हाच एकमेव पंथ आहे. एकत्वाने आत्मा आतबाहेर सर्वत्र तोच मिसळून गेला आहे. वाऱ्याच्या या दैवताला शरण जाऊन त्याच्याशी एकरूप झालेल्या ह्या दासरामाचा सर्व भार त्यानेच आपल्या शिरावर घेतला आहे. (६-७)





**२६) अभंग :**

**सळ सळ सळ झाडीतुनी । भर भर भर गगनी ।**
**गर गर गर करी अवनी । चिंचिणी चिद्‌गगनी ।।१ ।।**

**खळ खळ नाद करी पाणी । चळ चळ चळती फणी ।**
**गड गड गड गड मेघातुनी । नाद भरे श्रवणी ।।२ ।।**

**चंचळपण हे धरुनी । भरभरला त्रिगुणी ।**
**दासरामी तो आत्मा । नेई कसा तरुनी ।।३ ।।**

**विवरण :**

झाडीतून होणारी सळसळ, वाहणाऱ्या पाण्याची खळखळ, पाण्याच्या लाटांची चळचळ, गगनातून वाहणाऱ्या वाऱ्यांची भरभर, मेघांचा गडगडाट, पृथ्वीच्या गतीची गरगर तसेच या चिद्‌गगनात होणारा चिंचणीचा अनाहत नाद अशा सर्व नादांनी श्रवण भरून गेले आहे.

सारे विश्व अनाहतनादाने व्याप्त आहे. परंतु पंचमहाभूतांच्या सान्निध्याने नादाचे प्रकार आणि स्वरूप भिन्न भिन्न झालेले दिसतात. (१-२)

असा वायुरूप आत्मा आपल्या चंचळत्वाने त्रिगुणांच्या योगे विश्वात सर्वत्र व्याप्त आहे. हाच अंतरी असलेला आत्मा या दासरामाला पैलपार नेतो आहे. (३)

**२७) अभंग :**

**या गारा पाहू जरा । पावती निरआकारा ।।धृ ।।**
**जेथुनिया या आल्या । त्यातची विरून गेल्या ।**
**भासती ज्या नासती ज्या । पावू मुळी तो थारा ।।१ ।।**
**शीतपणे घन होती । उष्णची मिळवी नीरा ।**
**नीर मिसळे जई नीरा । पहावे केवी आकारा ।।२ ।।**
**शीतरूपे वायुची हा । उष्म ही तोचि उबारा ।**
**द्रवबिंदू जे झाले । त्याचे मूळ हा वारा ।।३ ।।**
**ते होऊ गमतीने । जेथुनी जीव पसारा ।**
**जीवन ते जीवसृष्टी । दाखवी सार असारा ।।४ ।।**
**चराचर व्यापक हा । अवघा एकची सारा ।**
**धन्य हा हरी माझा । दासरामी विस्तारा ।।५ ।।**

**शब्दार्थ :**

(१) थारा – आश्रय (२) सारा – सगळा, पूर्ण, पुरा.

**विवरण :**

पाणी आकाराला आले की त्याचे गारेमध्ये रुपांतर होते. कांही वेळाने विरघळून पुन्हा त्याचे पाणी होते. मुळात निराकार असूनही आकाराला आल्याने 'गारा' या स्वरुपात त्या भासतात. पाण्याच्या आश्रयातून त्या उगम पावतात व पुन्हा त्या त्यातच विरून जातात. अशा या गारा पाहणे मोठे विस्मयकारक आहे.

शीत व उष्ण या परस्परविरुध्द गुणधर्माच्या मुळाशी चैतन्यच आहे. उष्णतेने पाण्याची वाफ, त्या वाफेचे थंडीने द्रवबिंदूत रुपांतर होऊन पुढे त्याचेच





पाणी होते. पाण्यात पाणी मिसळणे म्हणजे निराकार व त्याचे गारेत रुपांतर हे आकाराला येणे होय. असे हे सातत्यधर्माने व्हावयाचे कारण म्हणजे मूळ चिद्गुणाचे वर्तुळाकृती स्वरूप होय. चैतन्यामुळेच हे सारे शक्य होते. (१ ते ३)

असार देहामध्ये साररूपाने असलेल्या जीवाची भेदवृत्ती मावळते तेव्हा या जीवसृष्टीमधील जीवाचे जीवन जेथून निर्माण झाले, त्या आत्मतत्वाशी अभेदरूपाने जाऊन मिसळते. कारण जीवाची गतीही वर्तुळाकार आहे.(४)

चराचराला पूर्णपणे व्यापून राहिलेला चैतन्यरूप हरी धन्य होय. या दासरामाचे अस्तित्व देखील त्या चैतन्याचाच विस्तार होय. (५)

**२८) अभंग :**

**वारा हा जगती भरला । उरला बोल खुंटला ।।१ ।।**
**सर्व पोकळिया विश्व । विश्वी पोकळी अपूर्व ।।२ ।।**
**बुध्दिगम्य ऐसा वारा । पहाणे निर्मिले चातुरा ।।३ ।।**
**वारियाच्या संगे भांडे । रहातील काय तोंडे ।।४ ।।**
**वारियाचा नवलाव । गुणागुण दावी ठेव ।।५ ।।**
**दासराम तया शरण । थोर तेची आचरण ।।६ ।।**

**विवरण :**

जेव्हा चैतन्याचा वारा जगतामध्ये भरून उरल्याचा अनुभव येतो तेंव्हा द्वैताचे बोलणे/व्यवहार खुंटतो, संपून जातो. नुसते सत्तत्व असते तर हे विश्व निर्माणच झाले नसते. सत्च्या ठिकाणी असलेल्या चिद्च्या लहरीमुळे विश्वाची उभारणी झाली आहे. या चिद्चा धर्म हालचाल असून या हालचाली लहरीच्या

स्वरुपात असतात. या लहरीचे प्रवाह असतात. प्रवाहामुळे पोकळ भाग निर्माण होतो. अशा प्रवाहामधील असलेल्या पोकळीला चिदाकाश म्हणतात. चिदाकाशाच्या या पोकळीपासून पुढे भूताकाश आणि अखिल विश्वाची उत्पत्ति होते. हे चैतन्याचे आकाश/पोकळी नामरुपामध्ये व्याप्त आहे. (१-२)

असे हे आकाश/पोकळी हातात सापडत नाही किंवा हाताने बाजूस सारता येत नाही. तसेच हे चिदाकाश शरीरातून वेगळे काढून दाखविता येत नाही, तरीही ते बुध्दिगम्य आहे. परमात्मा निश्चळ आहे म्हणून तो निश्चळ बुध्दीकडून ग्रहण केला जातो. अशा या चतुर चैतन्याला पाहण्यासाठी प्रथम चत्वार देहाचा निरास होऊन दृष्टीतील दृष्य दूर होते आणि नंतर सद्गुरु कृपेने अशी निश्चळ ज्ञानदृष्टी प्राप्त होते. मनबुध्दीची चंचळता संपून त्यांचे ऐक्य होणे हेच निश्चळतेचे वर्म आहे. हेच मनबुध्दीच्या अतीत होणे होय. (३)

चैतन्याच्या संगे भांडणे म्हणजे चैतन्याचे अस्तित्व नाकारणे होय. 'मी जिवंत आहे हे सिध्द करा' असे म्हणण्यासारखे हे आहे. चैतन्याचे अस्तित्व प्रयोगशाळेत सिध्द करता येणार नाही. कारण 'अस्तित्व' म्हणजेच आत्मा होय. हे चैतन्य/आत्मा प्रयोगी आहे. चैतन्य नाकारणाऱ्याच्या देहातील चैतन्यच निघून गेले तर असा युक्तीवाद करण्यासाठी तो जिवंत असणार नाही. (४)

गुण हे समुळ मायिक आहेत. चैतन्यामधील 'चंचळत्व' गुणांच्या कार्याला उत्पन्न करते. चैतन्य हे गुणातीत असूनही त्रिगुणांच्या संगतीत राहून विश्वातील विविध गुणांचा पसारा दाखविते हे केवढे बरे नवल ! (५)

हा दासराम अशा चैतन्य मार्गाचे आचरण करून त्यालाच शरण जाऊन राहिला आहे. (६)





**२९) अभंग :**

**हंकाराचा शोध करी । अहंकार हा चराचरी ।।१ ।।**
**जीवदशा ही जेथे तेथे । रेणूपासूनी व्योमी व्यापते ।**
**आत्मरूपी या रे लहरी । चंचळगुण हा पहा तरी ।।२ ।।**
**पाथरवट जरी या दगडासी । आला फोडाया त्यापासी ।**
**कंप सुटे दगडा भारी । जीव नव्हे का त्यासी परी ।।३ ।।**
**तीच गोष्ट या लतापल्लवी । त्यात वासही करी गुण दैवी ।**
**गगनचुंबी वा काटेरी । त्याही भावना याची परी ।।४ ।।**
**तेची परी या पशुपक्ष्यांची । दावी भावना सुखदु:खाची ।**
**एकची कमती ज्ञान परी । झाडोऱ्याहुनी श्रेष्ठ जरी ।।५ ।।**
**विकासुनी आत्मा जगी भरला । पूर्ण विकासा मानवी आला ।**
**पशुपक्ष्याहुनी तो उपरी । कारण त्यासी ज्ञान परी ।।६ ।।**
**परिपूर्णत्वे प्रभू जगी नटला । नि:शब्दाने तो आतुडला ।**
**शब्दरूप प्रकृती सारी । दासरामी हरि कृष्ण हरी ।।७ ।।**

**शब्दार्थ :**

(१) आतुडणे - सापडणे, स्वाधीन होणे

(२) पाथरवट - दगड फोडणारा (३) व्योम - आकाश.

**विवरण :**

अहंकाराचा जेंव्हा आपण शोध घेऊ लागतो तेंव्हा तो अहंकार सर्व चराचरी जाणीव रुपाने कमी अधिक प्रमाणात स्थित असल्याचे दिसते. (१)

निश्चळातील चंचळगुणामुळे चैतन्याच्या लहरी उत्पन्न होतात. जगातील

अणुरेणूपासून व्यापक अशा आकाशापर्यंत आत्मरुपाच्या/चैतन्याच्या लहरी स्फुरणरुपाने/स्पंदरुपाने असतात. म्हणजेच स्पंदरुपाने जीवदशा आहे, अहंकार आहे. याचाच अर्थ सर्व काही सजीव आहे, चैतन्यमय आहे. म्हणूनच पाथरवट जेंव्हा दगड फोडायला येतो तेंव्हा दगडालासुध्दा कंप सुटतो याचे कारण दगडामध्येही जीव आहे, सुप्तपणे अहंकार/जाणीव आहे. (२-३)

तीच गोष्ट लता-पालवी, गगनचुंबी वृक्ष, काटेरी झुडपे आणि वृक्षांच्या बाबतही आहे. दगडापेक्षा येथे जिवंतपणा जास्त आहे. पशुपक्ष्यांना सुखदुःख होते. तेथे झाडांच्यापेक्षा जाणीव अधिक विकसीत झालेली दिसते. असे असले तरी त्यांना स्वतःच्या असण्याचे ज्ञान नाही.

उपाधींच्या योग्यतेप्रमाणे चैतन्य अभिव्यक्त होते. मनुष्याच्या देहामध्ये चैतन्याला अभिव्यक्त करणारा लिंगदेह अत्यंत विकसीत असल्याने तेथे जाणीवेची/अहंकाराची अभिव्यक्ती सर्वोच्च प्रमाणात होते. स्वसंवेद्यतेमुळे आलेल्या आत्मभानामुळे माणूस सर्व प्राण्यात श्रेष्ठ ठरला आहे. (४-६)

सारी प्रकृती शब्दरूप/दृश्यरूप आहे. या शब्दाचा/दृश्याचा ग्रास झाला असता सर्व जगतामध्ये परिपूर्णत्वाने नटलेला निःशब्दरूप प्रभू गवसतो. सर्वत्र व्यापून राहिलेला हा हरिकृष्णप्रभू या दासरामाच्या ठिकाणीही पूर्णत्वाने नटलेला आहे. (७)





**३०) अभंग :**

**वारा हा खुळा किती वारा हा खुळा ।**
**पालवी फुलवी पाणी पाजोनी मुळा ।।१ ।।**
**देहपालवीच्या आत । देव दिसतो देहात ।**
**म्हणती तुकोबा समर्थ । भाव ये तुला ।।२ ।।**
**दासराम तेथे जडला । त्याचा ध्यास लागुनी ठेला ।**
**अंतर्बाह्य तोची झाला । भरलासे डोळा ।।३ ।।**

**शब्दार्थ :**

(१) पालविणे - पालवी येणे, मोहोरणे, विस्तार करणे

(२) भाव - अर्थ, अस्तित्व

**विवरण :**

चैतन्याच्या वाऱ्याचा हा किती विस्मयकारक खुळेपणा बरे! मुळाला पाणी पाजले असता आपोआप पालवी फुलली जाते. तसे हा चैतन्य देव आत असल्यामुळे हा देह ताजा आणि टवटवीत दिसतो. या देहाला शोभा आहे. आपल्याला येत असलेला रसरशीत जिवंतपणाचा अनुभव त्याच्याचमुळे आहे. त्याच चैतन्याला संत तुकाराम किंवा समर्थ 'भाव' म्हणतात. 'भाव' म्हणजे अस्तित्वभाव. 'भाव तोचि देव' मधील हा भाव म्हणजे चैतन्यरुपाने खेळणारा प्राण होय. (१-२)

अशा या चैतन्यदेवाचा दासरामाला ध्यास लागला आहे. अतंर्बाह्य सर्वत्र भरून राहिलेले हे चैतन्यच डोळ्यांमध्ये ठसून राहिले असून दासरामाचे चित्त तेथेच जडून राहिले आहे. (३)

**३१) अभंग :**

**वारिया मिळाले । ते ते वारे होवुनि ठेले ।।१ ।।**
**धन्य तेचि भक्त । चित्ते जहाले निवांत ।।२ ।।**
**गुरुकृपेची हे खूण । मुक्तदशा नामस्मरण ।।३ ।।**
**मुक्तीपरती भक्ती । केवळ जे आत्मस्थिती ।।४ ।।**
**पहाण्याचा जाला अंत । पहाणे बुडाले चित्तात ।।५ ।।**
**विज्ञान चोखट । दासराम तेथे विनट ।।६ ।।**

**शब्दार्थ :**

(१) विनटणे - तल्लीन होणे, रमणे, शोभणे (२) चोखट - चांगला, शुध्द

**विवरण :**

अभक्त नव्हे तो भक्त या व्याख्येप्रमाणे जे जे चैतन्यात मिसळून गेले ते ते सर्व चैतन्यमयच होऊन राहिले. तेच खरे भक्त होत. गुरुकृपेने ज्याना अशी स्थिती प्राप्त झाली, ते सर्व धन्य होत. अशा भक्ताच्या ठिकाणी गुरुकृपेने कांही खुणा उमटतात. प्रथम म्हणजे अशा भक्ताचे चित्त निवांत, निभ्रम झालेले असते. मुक्तीवरील अशी गुरुभक्ती ज्यांना प्राप्त झालेली असते, ते सतत आत्मस्थित असतात. त्यांचे मुक्तावस्थेतील नामस्मरण हे सहजस्मरण झालेले असते.(१ते ४)

आपल्या देहामध्ये पहाणारा आत्मा हा साक्षीचैतन्य व द्रष्टा असतो. म्हणून आपण बाहेरील दृश्य पाहू शकतो. अशा साक्षीचैतन्य द्रष्ट्याला आपण जेव्हा खऱ्या अर्थाने पहाते होऊ, तेव्हा आपल्या बाहेरच्या पहाण्याचा अंत होईल. चित्ताचे चैतन्य होईल. त्रिपुटीच संपल्याने पहाणाराही संपेल, बुडेल. आता पहाणेपणाने केवळ चैतन्यच विलसत राहील. मनाचे उन्मन झालेली हीच विज्ञानाची शुध्द अवस्था होय. हा दासरामही अशा अवस्थेत रमला आहे. (५-६)





**३२) अभंग :**

**हा प्राण आटला वाऱ्यामाजी संगम किती हा गोड ।।धृ ।।**
**शांत हरीच्या नामी काया । सर्व मन हे जाय विलया ।**
**वायुलहरी वायुसागरी मिनली जेणे हरीची जोड ।।१ ।।**
**लाट उसळे वारियाची । वृत्ती हेले या मनाची ।**
**ते ठायीच रमली विराम पावुनी । हरिनामाचे कोड ।।२ ।।**
**नवल नभी या पहाली आभा ।दृष्टी भरली दिव्य शोभा ।**
**वायुसंगे घर्षण होऊनी भरले । तेज कसे बिनतोड ।।३ ।।**
**वायुरुपे भक्त नटला । वायुरुपाकार झाला ।**
**दासराम ग्रासुनी चिदाकाशीया । नि:शब्दाची जोड ।।४ ।।**

**शब्दार्थ :**

(१) मिनणे - मिसळणे, एकत्र होणे

(२) कोड - इच्छा, कौतुक

**विवरण :**

सहस्त्रदळी चैतन्याच्या स्पंदलहरी वाढत जाऊन त्यांना जे वायुचे स्वरूप येते त्याला 'प्राण' म्हणतात. साधनेने उर्ध्वगामी झालेला प्राण सहस्त्रदळीच्या चैतन्य सागरामध्ये मिसळत राहतो. जेंव्हा हा प्राण पूर्णपणे त्यामध्ये आटून जातो तेव्हा त्या ठिकाणी झालेला संगम हा अत्यंत गोड असतो. हा प्राण जेव्हा चैतन्याशी एकरूप होतो तेव्हा जीवपणाच्या प्रदेशाचा नाश होतो. मनाचा विलय होतो. अतिशय शांत असे चंद्रामृत प्राशन केल्याने विविध ताप नाहीसे होऊन सर्व काया शीतळ होते. चैतन्यसागरामध्ये चैतन्याच्या लहरी एकमेकांमध्ये अखंडपणे

मिसळत राहतात. तेव्हा नि:शब्द हरीची प्राप्ती होते. (१)

सर्व जीवांच्या शरीरात स्पंदरुपाने चैतन्याच्या लाटा उसळत असतात. जीवांच्या देहामधील उठणारे मनोवृत्तींचे हेलकावे हे एका अर्थाने चैतन्याच्या लाटेचेच प्रतिबिंब होय. हरीनामाचे वैशिष्ट्य असे आहे की त्यामुळे मनोवृत्तीची उठलेली लाट ठायीच विराम पावते. हरीनामाने वृत्तीच निवृत्तीची इच्छा करते आणि चैतन्याच्या सागरामध्ये आपण होऊन मिसळून जाते. (२)

सहस्त्रदळी चैतन्याच्या लहरी उसळत असतात. त्यांच्या घासणीने निर्माण झालेला प्रकाश तेथे अखंडपणाने झळाळत असतो. चिदाकाशातील नवलप्रकाश तेजाची दिव्य शोभा भक्ताच्या दृष्टीमध्ये भरली जाते. (३)

भक्त हा अभक्त नसल्याने तो चैतन्याशी एकरूप होऊनच राहिलेला असतो. आत्मानुभूतीने तो आत्माकारच झालेला असतो. अशा वेळी अखेर जेव्हा चिदाकाशाचाही ग्रास होतो तेव्हा तो भक्त त्या पलीकडील नि:शब्द स्थितीला प्राप्त होतो. अशा नि:शब्दाशी एकरूप झाल्याने दासरामालाही घनानंद प्राप्त झाला आहे. (४)

**३३) अभंग :**

**वाराची देव आमुचा । वारा हा भक्त तयाचा ।।धृ ।।**

**वारा हा मायबाप । हरवी जो त्रिविध ताप।**
**विश्वाचा करी संकल्प । तो आत्मा या जगताचा ।।१ ।।**

**हा सांगातीचा धर्म । हा संप्रदाय बहु सुगम ।**
**नि:शब्द रूप आणि नाम । हा दासराम ज्याचा ।।२ ।।**





**विवरण :**

देव आणि भक्त यांचे खरे नाते अभेदरुपाने असते. चैतन्याचा वारा हाच आपला देव आहे. जगत्‌रुपाने तोच सर्वत्र नटला असल्याने भक्त हा देवापासून वेगळा नसून तोही चिद्‌वायुरूपच आहे. भक्त चिद्‌वायुस्वरुपाशी ऐक्य पावून स्वत:च चिद्‌स्वरुप होतो. 'शिवं भूत्वा शिवं यजेत्' याप्रमाणे अद्वैतातील भक्तीव्यवहार होतो.

जगतामध्ये आई-वडिलांच्या पोटी जीव जन्मास येण्यासाठी प्रथम त्या आई-वडिलांच्या ठिकाणी चैतन्य असणे आवश्यक आहे. म्हणून चैतन्यरुपी आत्मा हेच आपले खरे मायबाप आहेत.

मूळ चैतन्यस्वरुपात 'मी बहु व्हावे' ('अहं बहुस्याम') असा संकल्प उठला. या संकल्पामुळे चैतन्य विश्वरुपाने प्रकट झाले. हे चैतन्य म्हणजे या जगताचा आत्माच होय. हा आत्मा हाच आपला खरा धर्म असून तो आपल्या अत्यंत जवळ आहे. चैतन्यामुळेच देह धारण केला जातो. हा सांगातीचा धर्म असून या चैतन्याचा अनुभव घेण्याचा मार्ग अत्यंत सोपा आहे.

गुरुकृपेने साधनमार्गाने जाऊन चैतन्याचा साक्षात्कार झाल्यानंतर माणसाला भोगावे लागणारे त्रिविध ताप नाहीसे होतात. नामरुपातीत नि:शब्द चैतन्याच्या अखंड अनुभवाने दासरामही चैतन्याशी ऐक्य पावून चैतन्यरुपच होऊन ठेला आहे. (१-२)

**३४) अभंग :**

**धन्य आम्ही वायुपंथी । सहज साधनाची भक्ती ।**
**सहज नाम सहज चित्ती । सहजाची सहज प्राप्ती ।।१ ।।**

**चिदाकाशी जे निगुती । रामकृष्णी उर्ध्व गती ।**
**महाभक्त जेथ रमती । सहज स्थिती साधुसंती ।।२ ।।**

**वायुसंगती हे मन । उभे दोनी कर जोडुन ।**
**तेथची हे स्वात्मार्पण । इंद्रियवटि हे प्रकृती ।।३ ।।**

**प्रकृत जे सहजाकृती । तेची इंद्रियासी कृती ।**
**निसर्ग प्रतिगाम स्थिती । जनापरी होय रिती ।।४ ।।**

**पवाडेल कोण मनी । आचरिता हे सुनीती ।**
**शांत होय चित्तवृत्ती । उघड उघड आत्म दिप्ती ।।५ ।।**

**दासराम वायुभक्त । तेणेचि तो मुद्रित ।**
**नाम गाई हनुमंत । सहजासन अविकृती ।।६ ।।**

**शब्दार्थ :**

(१) निगुती - बरोबर, नेमके (२) अविकृत - न बदललेले

(३) प्रकृती - स्वभाव (४) प्रतिगाम - विरोधी

(५) पवाडेल - सामर्थ्य असणे, बळ, जोर.

**विवरण :**

सहजभक्तीचे साधन आचरणारे आम्ही वायुपंथी धन्य होत. येथे वायुसाधन हे सहज साधन आहे. माणसाच्या जीवनात फक्त श्वासच सहज आहेत. हे श्वसन वायुरूप आहे. श्वासाप्रमाणे गतीरुप नामाचे साधनही सहज आहे. म्हणून





हा सहजयोग असून त्याच्या आचरणाने सहजावस्था प्राप्त होते. (१)

जीवनातील रामकृष्णगती उर्ध्वगामी होऊन नेमकेपणाने चिदाकाशात स्थिरावते. या ठिकाणीच सहजस्थिती प्राप्त झालेले महाभक्त, साधुसंत रमलेले असतात. या ठिकाणी चैतन्याच्या संगतीने मन कर जोडून उभे रहाते आणि स्वत: होऊन चैतन्याला अर्पण होऊन राहते. एवढेच नव्हे तर इंद्रियांचे सहज स्वभावामध्येही पालट होतो. (२-३)

सर्वसाधारणपणे बहिर्मुख अवस्थेत इंद्रिये आपल्या सहज स्वभावाप्रमाणे कार्य करीत असतात. परंतु अंतर्मुख होऊन या नैसर्गिक स्वभावाच्या साधनेचे आचरण केल्याने चित्तवृत्ती शांत होते. बुध्दीमध्ये सामर्थ्य प्राप्त होऊन आत्मज्योतीचे उघडपणे दर्शन होते. (४-५)

वायुभक्त दासराम या सहजनामाने मुद्रित असून, सहजासनावर स्थिरावलेल्या सद्गुरु हनुमंतरायाचे नाम सतत गात आहे. (६)

**३५) अभंग :**

**इवलीशी अशी लाट आदळते जरी माझे हृदयी ।**
**काय गर्जना मध्य पुरामधी जगी मानव देही ।।१ ।।**

**खळबळ मनीची सांगू कुणाही परिसे भगवंता ।**
**सर्वव्यापी हरी तूची असूनी द्वैत रुचे चित्ता ।।२ ।।**

**भोज्य भोग भोक्ता ही त्रिपुटी उकलेना मजला ।**
**बहुरंगासी दाविसी एक तू हरी तुझी ही लीला ।।३ ।।**

**तू मोठा तव कीर्तीही मोठी कैचे ध्यान धरु ।**
**अहंपणाचे शिरता वारे चित्त घडे बधिरु ।।४ ।।**

अहंपणाने तव रुप मला न कळे दीनअनाथा ।
अहंकार हा हृदयी शिरता भय वाटे चित्ता ।।५ ।।
तूची निरंजन पूर्ण दयाघन भक्तांकित मद्रूपा ।
दासराम हा विनट तव पदी भक्तीबळे तू सोपा ।।६ ।।

**विवरण :**

पुराच्या मध्यभागी निर्माण झालेली लाट जशी गर्जना करीत चोहोकडे पसरते, तसे हृदयामध्ये उमटणारी अहंकाराची इवलीशी लाट अवघा देह व्यापून राहते. अहंकारामुळे भोक्ता-भोज्य-भोग अशी त्रिपुटी निर्माण होते. (१)

हे हरी, वास्तविक पाहता तू सर्वव्यापी असतानाही तुझ्या या त्रिपुटीच्या खेळाचे गूढ उकलत नाही. तुझे हे द्वैताचा आविष्कार करणारे बहुरंगी रूपही चित्ताला आवडावे, ही सारी तुझीच लीला आहे. (२)

हे हरी, माझ्या मनाची ही खळबळ तुझ्याशिवाय कोणाला सांगू बरे ? हृदयात शिरणाऱ्या अहंकाराच्या इवल्याशा लाटेने चित्त भयभीत होते. कारण अहंकाराच्या वाऱ्याने चित्तास बधिरता येऊन तुझा मोठेपणा, तुझी कीर्ती, तुझे रुप याचे आकलन होत नाही.

हे दीनानाथा, अशा अवस्थेत तुझे ध्यान कसे बरे करावे ? असे जरी असले तरी, निरंजन, पूर्ण दयाघन आणि भक्तांकित असा तू, माझ्या स्वरुपाच्या ठिकाणी भक्तीच्या बळाने मात्र सोपा झाला असून हा दासराम तुझ्या पदी तल्लीन होऊन राहिला आहे. (३ ते ६)





**३६) अभंग :**

वारा माझा मी वाऱ्याचा । तोची देवही देवांचा ।।१ ।।
वारा माझियात आहे । आत बाही तोची वाहे ।।२ ।।
जेथे उदेले मीपण । तयाहोनी आन कोण ।।३ ।।
कोण देव कोण भक्त । दासराम शरणागत ।।४ ।।

**विवरण :**

ज्यापासून ब्रह्मा-विष्णू-महेश हे देव तसेच सारे त्रैलोक्य आणि अनंत चराचर विश्व निर्माण झाले, तो खरा देव होय, थोरला देव होय. असा खरा देव म्हणजे चैतन्य होय. चैतन्य म्हणजे आत्मा आणि आत्मा वायुरूप असून वायूच सर्वोच्च देव होय. हा वायू म्हणजेच हरी. असा हा चैतन्याचा वारा किंवा चिद्‌वायु निरंजन, घन, निश्चळ आहे. हा चैतन्याचा वारा माझा असून मी त्या चैतन्याचाच होऊन राहिलो आहे. माझ्या आत व बाहेर तेच चैतन्याचे वारे भरून राहिले आहे. (१)

माझ्यामध्ये उठणारे 'मी'पणाचे स्फुरण हे त्या ईश्वराचे/चैतन्याचे स्फुरण आहे. सत्‌ला झालेले 'अहम्' चे स्फुरण हेच जगाचे मूळ आहे. तेच सत् चे स्फुरण माझ्यामध्ये उठले असून चैतन्यापासून वेगळेपणाची जाणीव नसलेले असे हे 'अहं' स्फुरण आहे. अशा तऱ्हेने मीच सर्व काही होऊन राहिलो आहे. माझ्याशिवाय अन्य कोणी नसल्याने मीच विश्वरूप होऊन गेलो आहे. (२-३)

चैतन्याशी तादात्म्यस्थिती हीच भक्ती होय. त्यामुळे वायुशी समरस होऊन वायुरूपच झालेल्या या दासरामाच्या ठिकाणी देव आणि भक्त असा वेगळेपणा राहिला नाही. असा हा दासराम चैतन्याशी शरणागत होऊन राहिला आहे. (४)

**३७) अभंग :**

**हरिभक्तीला शरण जाऊनी । हरिरंगी या नाचू रंगुनी ।। १ ।।**
**विजयपताका हाती धरुनी । धर्म घोषणा भरवू कानी।**
**दुमदुमवू हा हरिनामध्वनी । सत्य जयाची धरु ही कासणी ।।२ ।।**
**चंचळ माया देखू निरंजनी । वारा शब्दगुणाते ग्रासुनी ।**
**चिद्‌गुणी द्वय हे ऐसे जाणुनी । पहाता मुळी जे अद्वयची झणी ।।३ ।।**
**संतवाणी ही हृदयी कोरुनी । भृतिवचनाते पेरुनी श्रवणी ।**
**हरीचा जयजयकार करोनी । निर्भर हर्षभराने होऊनी ।।४ ।।**
**मृदंग लावुनी टाळ गर्जुनी । सूर सुरामाजी हा मिसळुनी ।**
**वीणा वाद्ये मन हे स्फुरवुनी । नादब्रह्म हे प्रगटवू वाणी ।।५ ।।**
**सुखरुप टाकू करुनी ही अवनी । अद्वय साम्राज्याते स्थापूनी ।**
**आनंदासी उधळू गगनी । दासराम हा विनट निरंजनी ।।६ ।।**

**शब्दार्थ :**

(१) कासणी – आश्रय, आधार (२) निर्भर – तल्लीन
(३) भृती – (भृ=वैदिक)

**विवरण :**

निश्चळ, नि:शब्द चैतन्य म्हणजे हरी होय. हरीच्या भक्तीमध्ये हरीला शरण जाणे म्हणजे त्या चैतन्याकडे आपली वृत्ती वळवून त्या रंगात रंगून जाऊन नाचणे होय. सर्वांना धारण करुन सर्वांचा आधार असलेल्या सत्‌रुपी हरीची विजयपताका हाती घेऊन त्याच्या नामाचा घोष कानावर घेत – तोच सर्वत्र दुमदुमवूया. (१-२)



श्रीदासराममहाराज विरचित
वायुलहरी - विवरण

चिदाकाशातील नादरहित शब्द गुणांचा ग्रास करुन, मुळात अद्वय असूनही केवळ चिद्‌गुणाच्या योगे द्वैताला जन्म देते अशा निश्चळ ठिकाणी सूक्ष्मतमरुपानी असलेली मूळ चंचळ माया पाहूया. (३)

संतवाणी हृदयात साठवून आणि वेदवचनांची श्रवणात पेरणी करून, तल्लीन होऊन, हर्षभराने हरीचा जयजयकार करुया. (४)

वीणा, मृदंग, टाळ यांच्या सुरांच्या गर्जनेमध्ये मनाचे स्फुरण ऊर्ध्वगामी करून, चारी वाणीमधून नामब्रह्म प्रकट करु या. (५)

सर्वत्र अद्वैताची स्थापना झाल्याने सारी पृथ्वी सुखरुप झाली आहे. अशावेळी चिद्‌गगनामध्ये आनंदाची उधळण करुन दासराम निरंजनी रमला आहे. (६)

३८) अभंग :

**रामकृष्णी शून्य । पहाणे आपणा आपण ।।१ ।।**
**गुण अगुण आटले । भेदाभेद जेथ सरले ।।२ ।।**
**शून्य जे पहाणे । दृष्टीपरते चंचळगुणे ।।३ ।।**
**पहाणे दृश्यादृश्य पहाले । दासरामी सर्व धाले ।।४ ।।**

**विवरण :**

रामकृष्ण या जीवनाच्या दोन गती असून यामध्येच त्रिगुणात्मक जाणीव असते. या गतीवर दृष्टि व कान एकवटले असता ही गती सूक्ष्मतर-सूक्ष्मतम होते व आकाशतत्वासह उर्ध्वगामी होऊन वाहू लागते. ही गती आता डोळ्याचे काम करते.

ही गती कारणदेहाशी आली असता त्रिगुण, गुण व अगुण आटलेले

असतात. कारणदेहातील रामकृष्ण गतींच्या डोळ्यांचे पहाणे हे शून्याचे पहाणे होय. कारणदेहाला 'शून्य' म्हणतात. (१-२)

येथून उर्ध्वगामी झालेले रामकृष्णगतीचे डोळे साक्षीचैतन्य प्रज्ञाचक्षुशी एकरूप होतात म्हणजेच रामकृष्णगती शून्य होते. हा प्रज्ञाचक्षु जेंव्हा अखिल विश्वाला व्यापतो तेंव्हा तो आपणच आपणाला पाहू लागतो. अशा शून्याच्या पहाणेपणामध्ये चंचळपणामुळे निर्माण झालेले दृश्यादृश्य विलयास जाते. त्रिपुटीच संपून गेल्याने सर्व भेदाभेद नाहीसे होतात. अशा अवस्थेत दासरामाला पूर्ण तृप्तता प्राप्त होत आहे. (३-४)

**३९) अभंग :**

**वारा डोळुला कसा वारा डोळुला ।**
**वारियाने जगामाजी उजेड केला ।।१ ।।**
**फार पूर्वी पहाता काय वायूचा गोळा ।**
**वारियाने पहाणे केले उघडे डोळा ।।२ ।।**
**वारा पहाता अवघा जगती तोचि आथिला ।**
**निश्चळपणे नाथिलाची होवुनिया ठेला ।।३ ।।**
**जीवदशा त्याचे ठायी तेजे प्रगटला ।**
**उष्ण शीत श्वेत श्याम रुपे व्यापिला ।।४ ।।**
**आधी पाहता पीताकार श्वेत पुढे जहाला ।**
**श्यामरुप शून्याठायी तोची पहाला ।।५ ।।**
**चैतन्याचा गुण ऐसा व्योमी शोभला ।**
**व्योमापासुनी व्योमची झाले नामरूपे नटला ।।६ ।।**





**वायु हरी ऐसा पहाता पहाता वाटला ।**
**दासराम निवांतपणे तटस्थची जाला ।।७ ।।**

**शब्दार्थ :**

(१) अथिला - असलेला (२) नाथिला - नसलेला, खोटे, मिथ्या
(३) व्योम - आकाश

**विवरण :**

सृष्टीच्या उत्पत्तिपूर्वी जाणीवनेणीवरहित चिद्वायुचा गोळा होता. त्या चिद्वायुची जी निजगती असते त्याचेच डोळे बनतात. जेथे चिद् आहे तेथे दृष्टी असते. चैतन्य हे डोळुले म्हणजे दृष्टीरुप असते. ज्ञानरुप द्रष्टा चैतन्यमय असतो. स्फुरण पावणे हा चैतन्याचा स्वभाव आहे. ज्ञानरुपाने होणाऱ्या चैतन्याच्या स्फुरणाबरोबरच त्याचा ज्ञानचक्षु उघडतो. त्यामुळे दृश्य म्हणजे ज्ञानरुपाने होणारे चैतन्याचे स्फुरण होय. चैतन्याच्या पहाणेपणामुळे विश्व दृश्यमय होते. हे आकाश, जग हे सर्व सूर्याच्या उजेडाने प्रकाशित होतात. परंतु सूर्यामध्ये जो उजेड/तेज आहे ते चैतन्याने सूर्याला प्रकाशित केल्यामुळे आहे. प्राण्यांची शरीरे व जीव यांची निर्मितीही देहामध्ये चैतन्य तेजरुपाने प्रवेश केल्यामुळे होते. अशा तऱ्हेने निश्चळ चैतन्याचे वारे जगात सर्वत्र भरले असूनही जीवाला मात्र ते नसल्यासारखेच झाले आहे. (१ ते ३)

चिदाकाशातील शून्यामध्ये पीतप्रभेपासून उष्ण, शीत तेज तसेच श्वेत निर्माण झाले. श्वेतापासून पुढे श्याम असा विविध विस्तार झाला. उष्ण व शीत ह्या तेजांच्या तत्वापासून पंचमहाभूते निर्माण झाली. सर्व आकारी पदार्थ कोणत्या तरी रंगाचे असतात. रंगाशिवाय आकारास राहता येत नाही. श्वेत व श्याम ह्यापासून विश्व रंगरुपास आले म्हणजे आकारास आले. चैतन्याच्या प्रकर्षाचे

चिदाकाशातील दर्शन मनोहारी आहे. चिदाकाशापासून (व्योमापासून) भूताकाश (व्योम) बनले आहे व पुढे सारे नामरुपात्मक सृष्टीरुपाने तेच चैतन्य सर्वत्र नटले आहे. (४-६)

चंचळ दृश्याचा त्याग करुन नित्यज्ञानद्रष्टा वायुरूप हरीला निश्चळपणाने पहाते झाले असता निवांतपणा प्राप्त होतो. दासराम अशा निश्चळ हरीरुपाला पाहून तटस्थच होऊन राहिला आहे. (७)

**४०) अभंग :**

**वारा उखळोनी उगाळिले विश्व । रामकृष्णी झाला हरी वासुदेव ।**
**शब्दरुपी कैची नि:शब्दाची ठेव ।**
**माया आवडी गिळुनी ते स्थिती अपूर्व गा ।।१ ।।**

**रामकृष्ण हरी रामकृष्ण हरी । रामकृष्ण हरी नारायण ।।धृ ।।**

**अवघाची नटला पूर्ण नारायण । तेथे पहाता आणि पहाणीस कोण ।**
**जेथे आटले माये पहाणे पहाणेपण ।**
**दासरामी पहाता अवघे निरंजन ।।२ ।।**

**शब्दार्थ :**

(१) उखळोनी - कांडणातून. (२) उगाळिले - बाहेर पडणे.

**विवरण :**

हे विश्व त्या चैतन्याचा अविष्कार आहे. चैतन्याच्या वाऱ्याच्या कांडणातून हे विश्व बाहेर पडले आहे. चैतन्याच्या हालचालीचा/स्पंदाचा हा विस्तार आहे.





चैतन्यरुप असलेला जीव देहतादात्म्याने/अहंकाराच्या ओझ्याने जड झाला आहे. त्याची दृश्याला वश झालेली अज्ञानाची ही अवस्था म्हणजे 'शब्द' अवस्था होय. चिदाकाशातील ज्ञानावस्थेत देखील नादरहित 'शब्द' असतोच. म्हणून अज्ञान व ज्ञान या दोन्ही अवस्थेमधील 'शब्दा' चा ग्रास झाल्याशिवाय अपूर्व अशी नि:शब्द अवस्था प्राप्त होत नाही. यासाठी रामकृष्ण या जीवनाच्या गतीशी तादात्म्य व्हावयास हवे. असे झाले की वासुदेव हरीरूप नि:शब्दाची ठेव प्राप्त होते. (१)

आत्मा हा द्रष्टा आहे, म्हणून 'पहाणेपण' निर्माण झाले. ज्या आत्म्याठायी पहाणेपण आहे, त्याला आपण पहाते झालो की केवळ 'पहाणेपण' उरते. तेथे केवळ पहाण्याचे स्फुरण असल्याने त्रिपुटी रहात नाही. असा द्रष्टा/आत्माच दृश्य झाल्याने सर्वत्र नारायणच नटल्याचा अनुभव येतो. दासरामही अशा नि:शब्द/निश्चळ अवस्थेत स्थित होऊन राहिला आहे. (२)

**४१) अभंग :**

**रामकृष्णी मन बुध्दी । परिपूर्णता त्रिशुध्दी ।।१ ।।**
**संकल्प विकल्प । तेचि मनाचे स्वरुप ।।२ ।।**
**निश्चयी संकल्प । तेचि बुध्दीचे स्वरुप ।।३ ।।**
**दासरामी मन । हाती येता समाधान ।।४ ।।**

**विवरण :**

इंद्रियांच्या द्वारा जीवाचे दृश्याशी होणारे तादात्म्य म्हणजे मन होय. या मनाचे स्वरुप म्हणजे संकल्प विकल्प करणे होय. केलेल्या संकल्पाचा निश्चय करणे हे बुध्दीचे कार्य होय.

रामकृष्ण ह्या जीवनाच्या दोन गती आहेत. ह्या गतीमध्येच प्राणगती व मनाची गती आहेत. जेंव्हा जीवनाच्या गतीवर दृष्टि व कान एकवटले जातात तेंव्हा मनाची व प्राणाची गती सूक्ष्म होते. मन ज्या सत्व, रज व तम ह्या गुणांच्या योगे काम करते त्या त्रिगुणांची शुध्दता होते. रज व तम नाहीसे होतात व सत्वगुणाचे शुध्दसत्वगुणात रुपांतर होते. असे हे शुध्दसत्वगुणयुक्त आधिमन हाती आल्यामुळे दासरामाला खरे समाधान प्राप्त झाले आहे. (१ ते ४)

**४२) अभंग :**

**शून्याची लहरी । शब्द अस्फुट निर्धारी ।।१ ।।**
**अदृश्य अ:शब्द । पहाता पहाता जे अभेद ।।२ ।।**
**प्रस्फुटता शब्द । नुरवी वारियाचा नाद ।।३ ।।**
**नाद गिळे वारा । अवघा वाराचि चातुरा ।।४ ।।**
**वारियाते लाट उठे । तेणेचि ते एकवटे ।।५ ।।**
**दासरामी वारा । देही तेणेचि उबारा ।।६ ।।**

**शब्दार्थ :**

(१) अस्फुट – गुप्त, एकत्र. (२) स्फुट – वेगळे, उघड.
(३) शब्द – ध्वनि, अक्षर समूह.

**विवरण :**

महाकारणदेहातील साक्षीचैतन्य द्रष्ट्याला जेंव्हा आपण पाहते होतो तेव्हा अशब्द, अदृश्य स्थिती नाहीशी होते आणि आत्मरूप अभेदरुपाने प्रत्ययास येते. महाकारणदेहामध्ये असलेल्या चैतन्यलहरीमध्ये नादरहित शब्दतत्व





गुप्तरुपाने असते. ते प्रकट झाल्याचा अनुभव येतो. असे हे शब्दतत्व विश्वनिर्मितीच्या वेळी विश्वामध्ये नादरुपाने प्रकट होते. हेच नादप्रकाशयुक्त असलेले चैतन्याचे वारे देहामध्ये एकवटले जाते. त्यामुळेच देहाला उबदारपणा आणि कांती प्राप्त होते.

बहिर्मुख जीव बाहेरील संघाताच्या नादाशी लुब्ध होऊन राहिल्याने त्याला स्वत:च्या देहामध्ये सतत उमटणाऱ्या चैतन्याच्या वाऱ्याचा नाद ऐकू येत नाही. परंतु सद्‌गुरुकृपेने तोच जीव जेव्हा अंतर्मुख होतो तेंव्हा हे चतुर चिद्‌वारे विश्वातील संघाताच्या नादाचा ग्रास करते आणि अशा जीवाला अनाहतनाद ऐकू येऊ लागतो.

हा दासराम अशा चैतन्याच्या वाऱ्याशी समरस होऊन राहिला आहे. (१ ते ६)

**४३) अभंग :**

**वाऱ्यावरी लागली नजर । देहभानाचा पडला विसर ।।धृ ।।**
**जेथे तेथे परमेश्वर । ठायी नुरला गुणहंकार ।।**
**वारिया पोटिया गगन । सगुणा दावी निर्गुण ।**
**निर्गुणी तृषारु सगुण । जगताची उठली लहर ।।१ ।।**
**वारियाची पावुनी सिध्दी । हरीभक्त हरी आनंदी ।**
**सद्‌गुणाढ्य सद्रुप धुंदी । सहजाची सहज समाधी ।**
**वारे हे करी झणकार । श्रीहरीचा जयजयकार ।**
**वाचा या सारुनी चार । हरिवाचे हरीचा गजर ।।२ ।।**

**सारुनी गुणागुणाते। गिळुनी शून्याआतौते।**
**रामकृष्णरुप त्यापरते। शून्य हे पहाले जेथे।**
**ग्रासिता देखणे चित्ते। श्रीरामकृष्णहरी रूप ते।**
**नि:शब्द ब्रह्म उमजे ते। दासराम हा किंकर।।३।।**

**शब्दार्थ :**

(१) अतौत्ती - मधील, पर्यंत. (२) किंकर - चाकर, दास

**विवरण :**

साधनाने उर्ध्वगामी झालेला प्राण सहस्त्रदळी मिसळत राहतो. वाऱ्यात वारे मिसळले जाते. अशा या वाऱ्यावर जेव्हा नजर लागते म्हणजे दृष्टि स्थिरावते तेंव्हा देहभानाचा विसर पडतो. सर्वत्र परमेश्वर दिसू लागतो. त्रिगुणांच्या सहाय्याने अभिव्यक्त होणारा अहंकार संपतो. सत्व, रज व तम ह्या तिन्ही गुणांचा नाश होतो. सहस्त्रदळी चैतन्याच्या वाऱ्याचा प्रकर्ष होतो. सहस्त्रदळी चैतन्याच्या पोटी असलेल्या नादप्रकाशरुपाने सगुण आत्म्याचा साक्षात्कार होतो. सगुण साक्षात्कारानंतर निर्गुण निरंजनाचा साक्षात्कार आपोआप होतो. येथे निर्गुण हे कोठल्याही गुणसंबंधाने म्हटले नसून निरुपाधिक अंतिम निरंजन सत् तत्वाला 'निर्गुण' म्हटले आहे. परंतु या निर्गुणालाही सगुणाची तहान लागते. म्हणूनच चैतन्यलहरी विश्वाकार होऊन राहतात. हे विश्व म्हणजे चैतन्याचा विलास आहे. (१)

हे विश्व वायुरुप आहे. तसेच आपले जीवनही चैतन्याच्या वाऱ्याने सिध्द केले आहे. देहात अखंडपणे असणारे चैतन्य ही सहजस्थिती आहे. म्हणून साक्षात्कार सदोदित आहे. सर्व विश्वाची सिध्दताच चैतन्याच्या अधिष्ठानावर झाली आहे. चैतन्याने सिध्दीस पावलेले हे विश्व पाहून हरिभक्ताला होणारा आनंद हरीस्वरुपाचा असतो. या आनंदाचा स्वाभाविक परिणाम म्हणून चारी वाचेचा





निरास होतो आणि हरिवाचेने म्हणजे नामाच्याच वाचेने हरिचा गजर आपोआप होऊ लागतो. या चैतन्याच्या गजराचा झणत्कार म्हणजे तो 'दिव्य अनुहात' नाद होय. तोच हरीचा जयजयकार होय. अनंतगुणानी मूळ सत्रुपाशी समरसता पावून धुंद होणारी सहजावस्था म्हणजे सहजसमाधी होय. (२)

सर्व प्रकारच्या गुण, अगुण, शब्द बाजूस सारून चिदाकाशामधील शून्याचा ग्रास होतो, तेंव्हा पाहणाऱ्याला पाहते होऊन पहाणेपणाचाच ग्रास होतो. यानंतरच रामकृष्णगतीच्या पलीकडील रामकृष्णहरीरूप नि:शब्द ब्रह्माचा उमज पडतो. अशा या हरीचा दासराम किंकर होऊन राहिला आहे.

**४४) अभंग :**

**वारियाने वारा उडविला। तव तो राहे शब्द।**
**शब्दाचिया ग्रासे अग्नी आनंदू नि:शब्द।।१।।**
**द्वैताद्वैत ग्रासी ऐसे अग्नीचे स्वरुप।**
**जेथे पा नुरलासे रामकृष्णी संकल्प।।२।।**
**वारियाचा शब्द तेथे वारियाचा नाद।**
**त्याचाची पडसाद अभिन्न दासरामी गोविंद।।३।।**

**विवरण :**

अष्टधा प्रकृतिचा निरास होणे म्हणजे अज्ञान अवस्था जाऊन ज्ञानावस्था येणे होय. ज्ञान व अज्ञान ह्या दोन्ही अवस्थांचे अधिष्ठान चैतन्यच असल्याने अज्ञानावस्थेतून ज्ञानावस्था येणे म्हणजे वाऱ्याने वारा उडविणे होय. चिदाकाशातील ज्ञानावस्थेने अग्निरूप आत्मसूर्याचे दर्शन होते.

नि:शब्दाचे अपूर्ण रूप म्हणजे चिदाकाशातील नादरहित शब्दस्थिती होय. आत्मसूर्याच्या अग्निमध्ये ज्ञान आणि अज्ञान ह्या दोन्ही ठिकाणच्या शब्दरुपाचा ग्रास होतो. द्वैताचे मूळ असलेल्या शब्दाचा ग्रास झाल्याने द्वैत शिल्लक रहात नाही. अग्निचे वैशिष्ट्यच आहे की जी वस्तू अग्निशी समरस होते त्या वस्तूचे वेगळे अस्तित्व शिल्लक रहात नाही. (१)

रामकृष्णगती हा जीवाचा भाव असून त्यामधील जीवाचा संकल्पच नाहीसा झाल्याने केवळ निर्विकल्प अवस्थाच शिल्लक रहाते. अशी निर्विकल्प अवस्था हेच आनंदाचे नि:शब्द रूप होय. तेथे केवळ जो चैतन्याचा नाद उरतो तोच चैतन्याचा शब्द होय.

सद्‌गुरु गोविंद (मामा) हे या दासरामाच्या हृदयामध्ये चैतन्याच्या प्रतिध्वनिरुपाने, अभिन्नपणे एकरुप होऊन राहिले आहेत. (२-३)

**४५) अभंग :**

**हा वारा हा मुक्त करी त्वरितची झणी।**
**जो साक्षित्वे सतत राही तेथ साधुनी।।१।।**

**नित्य सदा रंगे जो परिसुनी ध्वनी।**
**श्रवणे या श्रवणरुप नामगायनी।**
**द्विशून्या एकवटुनी उलट करोनी।**
**अलक्ष्याते लक्ष्य भिडवी शब्द चिद्‌गुणी।।२।।**

**शब्दशून्य ग्रासुनिया शून्य साधुनी।**
**ग्रासुनिया अशब्दा शून्य होवुनी।**
**जीवभाव नयनातुनी श्रवणी आणोनी।**
**श्रवण नमन करुनी सदा नामी रंगुनी।।३।।**





**दासराम जाण नेण जाय हारपुनी।**
**आत्म शुध्द संकल्पी धन्य ते मुनी।**
**धन्य संत त्यांचिया पायी लागुनी।**
**हा जीवात्मा शंभुरूप जाय होऊनी।।४।।**

**विवरण :**

चिदाकाशातील सोहंरुप साक्षीचैतन्याचा अखंड अनुभव आला असता जीव शिवाशी एकरूप होऊन त्वरीत मुक्तच होऊन जातो. चिदाकाशामध्ये उठणाऱ्या अखंड अनाहताचे श्रवण हे खरे नामगायन होय. ह्या नामगायनाच्या श्रवणाने श्रवणरूपच झाले की भूताकाश व चिदाकाश ही दोन्ही शून्ये एकवटली जातात व उर्ध्वगामी अलक्ष्य अशा चिद्‌गुणयुक्त नादरहित शब्द तत्वाला लक्ष्य केले जाते. (१-२)

हे होण्यासाठी प्रथम स्थूल व सूक्ष्म देहातील 'शब्द' शून्याचा तसेच कारणदेहातील 'अशब्द' शून्याचा ग्रास होतो. यानंतर चिदाकाशातील नयनात उमटणाऱ्या नादाचे श्रवणात रंगून जाऊन मनाचे मनत्व नाहीसे होते. अर्थात जीवभावाचा नाश होतो. (३)

आत्मरूप आणि शुध्द संकल्पाने वावरणारे संत/मुनी धन्य होत. अशा संतांच्या चरणसेवेने जाणीव-नेणीव गेल्याने ह्या दासरामाचा जीवात्मा शंभुरूप/शिवरुप होऊन राहिला आहे. (४)

४६) अभंग :

**थांबला दृष्टीचा चाळा। घातला  मनाला आळा।।धृ।।**
**मन झाले वेड्यावाणी। वारियाची कैसी करणी।।१।।**
**विस्तार पावली शून्य। ती स्वरुपी जहाली अनन्य।**
**जीवभाव उरला नान्य। दासराम तेथ पहाला।।२।।**

**विवरण :**

आपण पहातो म्हणून आपल्याला हे दृश्य दिसते. दृष्टीच्या अस्तित्वाशिवाय दृश्य नाही. हा दृष्टिसृष्टीवाद आहे. दृश्याला आसक्त होऊन दृष्टी चंचळ बनते. दृष्टीला दृश्याचा चाळा लागतो. परंतु अंतर्मुखता प्राप्त होताच चंचळ दृष्टीचा चाळा थांबून वेड्या मनाला आळा बसतो. त्याला चैतन्याचे आकर्षण वाटू लागते. ही केवढी बरे त्या वाऱ्याची करणी! (१)

साधनेमध्ये जीवनगती प्राणगतीशी एकरूप होऊन उर्ध्वगामी होते. अशी उर्ध्वगामी झालेली गती आत्म्याला पहाणाऱ्या  डोळ्याचे काम करते. त्या गतीचे डोळे जेथे स्थिरावतात त्याला आकाश/शून्य म्हणतात. कांही काळ स्थिरावून पुन्हा तेथून दुसरी गती सुरु होते. अशा तऱ्हेने गती आणि शून्य यांच्या या उर्ध्वगामी प्रवासात शून्याचा विस्तार होत होत अखेर ते स्वरुपाशी अनन्यच होऊन राहते.

जेथे जीवभावही शिल्लक रहात नाही अशा आत्मरुपाकडे दासराम निश्चळ दृष्टीने पहातो आहे. (२)





४७) अभंग :

**निखाऱ्यावरी हा वारा राख उठवितो भराभरा।**
**दृष्टी टाकुनी पहा जरा। अनुभव येईल खरा खरा।।१।।**
**फुलवी निखारा हा वारा राख राखिते उबारा।**
**राख उडाली गोळा होऊनी प्रकाश देई प्रतिद्वारा।।२।।**
**प्रकाशेची दृश्याभास जीव आणिला भानास।**
**ज्ञान देवुनी त्या जीवा सुखसंवेदन देई जरा ।।३।।**
**राख उडाली तरी ज्योती। बेभानची ते जीवस्थिती।**
**जीवशिवाची गाठी घालुनी। निरोधनी देई थारा।।४।।**
**संतांचा अनुभव पुरा। जरी साधिला हा वारा।**
**दासराम हा शरण तया अंकित होऊनी राही बरा।।५।।**

**विवरण :**

निखाऱ्यावरती राख म्हणजे ज्ञानावर अज्ञानाचे आवरण होय. साधनेने जीवनाची गती उर्ध्वगामी होऊ लागताच हीच गती डोळ्याचे काम करते. ही गती जेथे पडते त्याला डोळा म्हणतात. आत्मा वायुरूप आहे म्हणून त्याला पाहणारी दृष्टीही वायुरूपच आहे. या वायुरुप दृष्टीचा मारा आतील चैतन्याच्या वाऱ्यावर केला असता देहबुध्दीचा उबारा देणारी अज्ञानाची राख उडून जाऊन ज्ञानाचा निखारा फुलला जात असल्याचा अनुभव येतो.

वायुचा प्रकाश म्हणजे आत्म्याचा प्रकाश होय. साधनेने दृष्टीच्या माऱ्याच्या फुंकरातून अज्ञानाची राख उडून आत्मज्ञानाचा निखारा फुलतो. त्या ज्ञानप्रकाशामुळे जीव भानावर येतो व त्याला आत्मसुखाची प्राप्ती होते. (१ ते ३)

चित्ताच्या निरोधाने अज्ञानाचा निरास होऊन जीवशिवाची गांठ पडते. जगतविस्मृतीच्या आणि आत्मस्मृतीच्या बेभान अवस्थेत आत्मज्योतीचा अनुभव येतो. (४)

अशा तऱ्हेने चैतन्यस्मरण साधून आत्मानुभव सर्व संतांना आलेला आहे. हा दासरामदेखील त्या चैतन्याला शरण जाऊन त्याचाच अंकित होऊन राहिला आहे. (५)

**४८) अभंग :**

**चैतन्याच्या वाऱ्या तुला माझा नमस्कार।**
**तुझा नाद प्रकाश हाची आम्हा साक्षात्कार ।।१ ।।**
**तुझे स्फुरण सदा हाची अनुग्रही निर्धार ।**
**तेथे तादात्म्यता हाचि भक्तीचा बडिवार ।।२ ।।**
**तुझा ध्वनी कानी घुमे तोची जयजयकार ।**
**मनाची शुध्दता हाची मोठा चमत्कार ।।३ ।।**
**सकल देव धर्म पंथ तूची आम्हा साचार ।**
**मायबाप गुरु दासरामी तू साकार ।।३ ।।**

**शब्दार्थ :** (१) अनुग्रह - कृपा, प्रसाद, उपकार. (२) बडिवार - वैभव, थोरवी. (३) साचार - खराखुरा, खरा.

**विवरण :**

हे चैतन्याच्या वाऱ्या, तुला माझा नमस्कार असो. आत्मवस्तुचे यथार्थ दर्शन म्हणजे साक्षात्कार. चैतन्य हीच आत्मवस्तु असून त्याचा नाद आणि प्रकाश याचा अनुभव म्हणजेच चैतन्याचा साक्षात्कार होय. (१)





नादब्रह्म सर्व विश्वात दुमदुमत आहे. चैतन्याचा प्रकाश म्हणजे त्याचे रुप व त्याचा नाद म्हणजेच त्याचे नाम होय. देहात उमटणारे त्याचे नाम गतिरुप आहे. चैतन्याच्या प्रकाशरुपात जे स्फुरण पावते तोच नाद होय. चैतन्याचे नाम/गती स्फुरणरुप आहे. कमीजास्त न होता अखंडत्वाने स्फुरणाऱ्या नामाशी तादात्म्यता पावणे हेच भक्तीचे वैभव होय. हाच त्या चैतन्याचा खऱ्या अर्थाने कृपाप्रसाद होय, अनुग्रह होय. (२)

त्या चैतन्याचा ध्वनि सतत कानात घुमत राहणे म्हणजेच त्याचा जयजयकार होय. अशा भक्तीचा परिणाम म्हणून मन अत्यंत शुध्द होऊन ते उन्मन अवस्थेत जाते. चार देहाचा निरास होतो. हाच त्या चैतन्याचा मोठा चमत्कार होय. (३)

विश्वात सकल देवधर्म पंथ असले तरी खराखुरा देवधर्म म्हणजे, हे चैतन्यदेवा, तूच आहेस. तूच मायबाप तसेच सद्गुरु असून या दासरामाच्या ठिकाणी तूच साकार झाला आहेस. (४)

**४९) अभंग :**

**रामकृष्ण शून्य जीवाची उपाधी । जेथ चिद्गुणाची नुरली रे सांदी ।**
**नाद आटला विराली त्रिशुध्दी । जेथ पावली सहज समाधी गा ।।१ ।।**
**रामकृष्ण हरी रामकृष्ण हरी । गोविंद मुरारी रामकृष्ण ।।धृ।।**
**उष्ण शीत रूप वाचा रामकृष्ण । एक श्वेत दुजे श्याम रुप गहन ।**
**जेथ नादघोष जहाला चिद्गुण। तोही विराम म्हणता नारायण गा ।।२ ।।**
**जेथिचिया तेथे जहाली विश्रांती । नामरुप धाले आपुलिया चित्ती ।**
**दासरामी गुरुकृपा रुप होती । हस्त ठेवोनी मस्तकी बोधिती गा ।।३ ।।**

**विवरण :**

साधनेच्या योगे जीवाची उपाधी शून्य होते, तेंव्हा चिद्गुणानी युक्त अशी रामकृष्ण गती सूक्ष्मतम होते. त्रिगुण आटतात. अशावेळी सहज-सत्-नि:शब्द अवस्थेत सहज समाधी प्राप्त होते. (१)

चिद्गुणाच्या योगे चिदाकाशातील रामकृष्ण गतीमध्ये उष्ण-शीत, श्वेत-श्याम ही सूक्ष्मतत्वे बीजरुपाने असतात. त्या ठिकाणी चिद्गुणामुळे होणारा अनाहताचा नादघोषही विराम पावतो तेंव्हा नि:शब्द नारायणाची प्राप्ती होते. (२)

सद्गुरु नारायण म्हणजेच निंबर्गीकरमहाराजानी कृपेने मस्तकी हस्त ठेवून बोध केल्यामुळे, चित्ताला नामरुपाचे ध्यान लागून, जीवाचे जे मूळ स्थान, त्या सहजावस्थेत दासरामाला तृप्तता/विश्रांती प्राप्त झाली आहे. (३)

**५०) अभंग :**

**पाहू कोठे येते लाट। बिनबोभाट।**
**लाट ही केवढी भाई काठोकाठ ।।१ ।।**
**जीवभाव दडपे माझा आडवाट ।।२ ।।**
**साठ हे सांडूनी शोधू एकसष्ट ।**
**निवळले जीवन पहाता जे निघोट ।।३ ।।**
**तेथची साधू या मनीची एकवट ।**
**हरिठायी दासराम हा विनट ।।४ ।।**

**शब्दार्थ :** (१) विनटणे - रमणे, तल्लीन होणे. (२) लाट - लहरी.





**विवरण :**

चिदाकाशातील चैतन्याच्या लहरी बिनबोभाटपणे सातत्याने उसळत असतात. या लाटा विश्वरुपाने पूर्णत्वाने काठोकाठ पसरलेल्या असतात. मानवी देहामध्ये देहभावाची आडवाट सोडून जीवन जेंव्हा उर्ध्वगामी होऊ लागते तेंव्हा जीवभावाला धक्का बसून तो दडपला जातो. (१-२)

उर्ध्वगामी जीवनामध्ये देहामधील तीनशे साठ नाड्या बाजूस सारून एकसष्टावी सुषुम्ना नाडी हाती येणे महत्वाचे आहे. ही एकसष्टावी कळ साधली असता जीवन निवळते, शुध्द होते व निघोट परमात्म्याचा साक्षात्कार होतो. अशा या हरीरूप परमात्म्याच्या ठिकाणी मन एकवटून दासराम त्या ठिकाणी तल्लीन होऊन राहिला आहे. (३-४)

**५१) अभंग :**

**आत बाहेर वाहे वारे। नादरुपा आले सारे ।।१ ।।**
**वारे मिळाले वारिया। डहूळ ते जाय विलया ।।२ ।।**
**साभिमाने भेडसावी। निरभिमाने वेड लावी ।।३ ।।**
**कृष्ण विष्णू नारायण। दासरामी समाधान ।।४ ।।**

**विवरण :**

जड देहाच्या आत आत्मरुपाने व बाहेर सर्वत्र जड नामरुपाच्या उपाधीमध्ये गुप्त रुपाने चैतन्यच व्याप्त आहे. जड देहाच्या उपाधीमुळे अहंकाराचे स्फुरण होते. देहाच्या जाणीवेने अहंकाराच्या वाऱ्याची लाट उठते. जाणीव म्हणजेच अहंकार. हा अहंकार वायुरुप आहे. वायुरुपात जाणीव असणे हाच अहंकार. देहाची जाणीव/अहंकार सुटला की तोच चैतन्याला चिकटून चैतन्यरूप

होतो. देहाच्या अहंकाराचे वारे चैतन्याच्या वाऱ्यात मिसळून जाते. अधोगामी जीवन साधनेच्या योगे डहुळले जाऊन जेंव्हा उर्ध्वगामी होते तेंव्हा अहंकाराचा निरास होऊन ते चैतन्याशी तादात्म्य पावून चैतन्यरूपच होऊन जाते.(१-२)

देहाच्या अहंकाराने म्हणजे 'मी म्हणजेच हा माझा देह', या जाणीवेने जीवन संसारात आसक्त झाल्याने त्याला सर्व प्रकारची दु:खे भेडसावीत राहतात. परंतु ज्याचा देहाभिमान सुटलेला आहे तो मात्र निर्भय होऊन आत्मानंदाच्या भरात असतो व इतरानाही तो आत्मानंदाचे वेड लावतो. (३)

अशा तऱ्हेने कृष्ण, विष्णू, नारायण या चैतन्यनामाने देहाहंकार सुटल्याने दासराम चैतन्याशी एकरुप होऊन नित्य समाधानात आहे. (४)

**५२) अभंग :**

**वारे कधी प्रगटेल मनात ।।धृ ।।**
**वायुमनाची गाठी होता । चित्ता नुरते काही चित्तता ।**
**चित्त चिदात्म्या येई ऐक्यता । नेटुनिया गगनात ।।१ ।।**
**संत त्याते भजती नेमी । त्याची हृदयी उठती ऊर्मी ।**
**दासराम हा जडला नामी । रंगुनिया ध्यानात ।।२ ।।**

**विवरण :**

हे चैतन्याचे वारे मनामध्ये कधी बरे प्रकटेल ? मन हे जड व चैतन्य ह्या दोहोनी बनलेले आहे. जेंव्हा चैतन्य पूर्णपणे मनामध्ये प्रकटेल तेंव्हा त्यातील जडांश पूर्णत्वाने संपेल आणि तेंव्हाच मन हे उन्मन होईल. मनाची प्रकाशशक्ती व त्याच्या हालचालीचे सामर्थ्य चैतन्याच्या हातात आहे. चित्त म्हणजे मनाचे मन





होय. जेंव्हा प्राणाची स्पंदशक्ती चैतन्याकडून चेतवली जाते तेंव्हा चित्त बनते. चित्ताचे दृश्याकार होणे म्हणजेच कल्पना होय. असे संकल्प-विकल्प करणारे चित्त म्हणजे मन होय.

जेंव्हा साधनेने मनाची गती प्राणगतीशी एकरुप होते, त्यांची गाठ पडते तेंव्हा चित्त हे चित्तरुपाने रहात नाही. दृश्य मावळते. चित्त हे चैतन्याचाच अंश आहे. दृश्यादृश्य सोडून चित्ताचा विषय केवळ चैतन्य होईल, तेंव्हा चित्ताची चैतन्याशी ऐक्यता होईल. अशा वेळी शिरोहृदयात केवळ चैतन्याच्या उर्मी आनंदाने नटून राहतात. (१)

संत अशा चिदात्म्याचे नित्य भजन करीत असतात. दासरामही अशा चिदात्म्याच्या नामाच्या ध्यानात रंगून गेला आहे. (२)

**५३) अभंग :**

**वारियाची मौज किती न्यारी रे । वाऱ्यावरी माझी बहू प्रीती रे ।।१।।**
**वारा दावी सगुण निर्गुण रे । आत्मवस्तू दावी कशी प्यारी रे ।।२ ।।**
**वारियाच्या हाती जीव सारे रे । वारा हा जीवाचा जीवन रे ।।३ ।।**
**शुध्द जे निरंजन वारे रे । चातुरा मनाचा साक्षी रे ।।४ ।।**
**आत बाहेर खेळे वारे रे । वारेची आवघे जाले रे ।।५ ।।**
**वारियाने आकाशा गिळिले रे । वारियाने आकाशा फोडले रे ।।६ ।।**
**आकाशात वारे हे भरले रे । नामरुप गुणाने नटले रे ।।७ ।।**
**संतासी अंकिले वारे रे । दासराम त्याचे पायी लोळे रे ।।८ ।।**

**विवरण :**

मूळ ब्रह्म हे शुध्द निरंजन असून निश्चळ आहे. ह्या निश्चळामधील सूक्ष्म चंचळ चैतन्य प्रवाही होते. प्रवाही चंचळ चैतन्याच्या वाऱ्याने हे विश्व प्रकट केले आहे. तोच जगताचा आत्मा आहे. तसेच देहामधील आत्मस्वरुप हे ही चैतन्यच आहे. अशा तऱ्हेने निश्चळ निर्गुण तसेच चंचळ सगुण ही दोन्ही त्याचीच विलक्षण रुपे आहेत. (२)

चैतन्याशिवाय शरीरात जीवन असू शकत नाही, म्हणून जीवन म्हणजे चैतन्य होय. चैतन्याच्या अधिष्ठानावर शरीराची हालचाल व जाणीव राहते. सृष्टीतील साऱ्या जीवांचे अस्तित्व चैतन्याच्या हातात आहे. असा हा चतुर वारा देहामध्ये अंत:करणाचा साक्षी होऊन राहतो. (३-४)

चैतन्यवारे हे आकाशासह सर्वत्र अंतर्बाह्य व्यापून आहे. सर्व कांही केवळ वारेच आहे. आकाशावर प्राणाचा संघात होतो, तेंव्हा आकाशतत्वातील अशून्याचा ग्रास होतो. आकाशतत्वातील जडत्व फोडले जाऊन त्यापासून बनलेल्या नामरुपानी व्याप्त अशा पंचमहाभूतात्मक सृष्टीमध्ये हे वारे व्यापून राहते. (५ ते ७)

अशा या सृष्टीमध्ये आपल्या अस्तित्वाने मौज/लीला दाखविणाऱ्या वाऱ्यावरती या दासरामाची अत्यंत प्रीती आहे. असे हे वारे संतांच्या अंकित असून दासराम त्यांचे चरणावर लोळतो आहे. (७-८)





**५४) अभंग :**

**हे वारे जगी पसरे आत्म्याचा मोद भरे ।**

**हरिगुणी जन हृदी विचरे । झण झण झण ध्वनी विकिरे ।।१ ।।**

**आत्मत्वे हरी सारे रक्षी हरिगुण गुण । जनी रे हरिभक्ती मनी बहरे ।**

**दासराम अंतरी रे ।।२ ।।**

**शब्दार्थ :**

(१) विचरणे - भटकणे, हिंडणे, फिरणे.

(२) विकिरणे - अस्ताव्यस्त पसरणे.

(३) गुण - सूत्र, विशेष धर्म.

**विवरण :**

हे चैतन्याचे वारे जगतामध्ये सर्वत्र पसरले आहे. हा चिद्वायू या जगताचा आत्मा असून तो सर्वत्र आनंदरुपाने भरलेला आहे. त्याचा झणझण असा झणत्काराचा ध्वनि सर्व आसमंतात पसरून राहिला आहे. जगातील सर्व जनांच्या हृदयामध्ये गतीरूप असलेले हे वारे विशिष्ट अशा एका चैतन्यसुत्रामध्ये गुंफलेले आहे. सर्व जनांची हृदये याच चैतन्यसुत्रानी बांधलेली आहेत. (१)

हा चैतन्यमय हरी विशेषधर्मानुसार आत्मत्वाने सर्वांचे रक्षण करतो आहे. सच्चिदानंद हरीचे भक्तीसुत्र जनमानसामध्ये जसे गुंफून राहिले आहे तेच भक्तीसुत्र दासरामाच्या अंतरीदेखील बहरून राहिले आहे. (२)

**५५) अभंग :**

**वारा झालो । मग जगासी पाहुनी हसलो ।।धृ ।।**
**वारा अवती भवती सगळा । सूर्यचंद्रही वायुच जाहला ।**
**अणु परमाणू पाणिही बनला । त्यात विरालो ।।१ ।।**
**बाह्य उठवणी सर्व वायुची । त्यावरी वसती सर्व जीवांची ।**
**त्यावाचुनी धडगती कुणाची । तिथेची धालो ।।२ ।।**
**मनबुध्दीचे भान त्यावरी । बुध्दीगती आकुंठित नातरी ।**
**त्या विवरी आत्म्याची अंतरी । निश्चळ झालो ।।३ ।।**
**निश्चळी चंचळ लाट पसरली । वायुलहरी ही आत्मी वितरली ।**
**द्वैत दावुनी अद्वयची मुळी । तिथूनची आलो । ।४ ।।**
**ख्रिश्चन मुस्लीम हिंदुही सारे । मुळी पहाता एकचि वारे ।**
**शेवटी तेची येई हाता रे । अद्वयी झालो ।।५ ।।**
**दुभागिले पाणी ते पाणी । एकी एकची जाय मिळोनी ।**
**जावे कोठे त्याविण म्हणुनी । तेथ मिळालो ।।६ ।।**
**कोणी कुणाशी जगी भांडावे । कोणी मरुनी कुणी जगावे ।**
**कोणी जगी या सुखी नांदावे । गुरुपदी धालो ।।७ ।।**
**ढकले तेवढे ढकलुनी द्यावे । लाटेने लाटे परतावे ।**
**नातरी उगाची स्वस्थ रहावे । म्हणुनी ठेलो ।।८ ।।**
**जीवभाव हा स्वार्थी ऐसी । सांगितली जरी कहाणी ।**
**बहुत मजा ती आत्म्याचे गुणी । तेथ पहालो ।।९ ।।**
**जीव मारुनी सद्‌गुरु जीववितो । धन्य तेची स्वानंदाधिपती ।**
**गोविंद सुताचे ते श्रीपती । तेथ निवालो ।।१० ।।**





**शब्दार्थ :** वितरणे - देणे, प्रसन्न होऊन बहाल करणे.

**विवरण :**

हा दासराम चैतन्यमय होऊन चैतन्याचाच आविष्कार असलेल्या या जगाकडे पाहून कौतुकाने, आनंदाने हसतो आहे. अणु, परमाणू, पाणी इत्यादी पासून चंद्रसूर्य हे सारे चैतन्याचे आविष्कार असून अवती भोवती सर्वत्र असलेल्या चैतन्यामध्ये मी विरून गेलो आहे. अखिल विश्व ही त्या चैतन्याचीच बाह्य उठावणी असून त्यामध्येच सारे जीव वस्ती करून आहेत. ज्याच्यावाचून कोणाचीही धडगत नाही अशा चैतन्याठायी मनाला पूर्ण समाधान प्राप्त झाले आहे. (१-२)

जीव व जगत ही चैतन्याची रुपे असल्याने जीवाला होणारे मनबुध्दीचे भान चैतन्यामुळे आहे. तसेच कुंठित/जड असलेल्या मनबुध्दीला होणारे जाणीवेचे भान चैतन्यामुळे आहे. अशा या देहातील विवरस्थानी असलेल्या अंतरात्म्याशी मी निश्चळ होऊन राहिलो आहे. निश्चळामधील आत्मस्वरुप चंचळाची लाट म्हणजे या वायुलहरी होत. मूळ अद्वय असूनही द्वैतरुपाने त्या जगताचा भास निर्माण करतात. अशा मूळ निश्चळापासूनच मी आलो आहे. अद्वय स्थितीशी एकरूप होऊन राहिल्याने ख्रिश्चन, मुस्लीम, हिंदू वगैरे बाह्य धर्म, जाती असे भेद दिसत नाहीत तर सर्वांमध्ये असलेले चैतन्यच दिसते आहे. (३-५)

पाणी दुभंगण्याचा प्रयत्न केला तरी शेवटी ते पाणीच राहते. तसे कृत्रिम भेदभावानी चैतन्य दुभंगले जात नाही. अशा या चैतन्याशी मी मिळून गेलो आहे. अशावेळी सर्वच चैतन्यरुपाने असल्याने भांडावे तर कोणाशी ? मरणार कोण आणि मारणारा तरी कोण आहे ? सुखदु:खाचे भोग घेणारा माझ्यापेक्षा वेगळा कोणी नाही. हे सर्व पाहून गुरुपदांशी मी समाधान पावून राहिलो आहे. (६-७)

अशा वेळी सहजच जसे एक लाटेने दुसरी लाट आपोआपच परतवली जावी तसे या प्रापंचिक जीवांना चैतन्याकडे उद्युक्त केले जाते, ना तरी उगाच आपल्या ठायी स्वस्थ राहिले जाते. जीवभावाच्या ठिकाणी स्वार्थ असतो. आत्मा जीवाच्या गुणासंगे वावरताना पाहून होणारी मौज पाहता झालो आहे. जीवभाव मारून खरे जीवन देणारे या गोविंदसुताचे श्रीपती स्वानंदाधिपती सद्गुरु धन्य होत. त्यांचे चरणी हा दासराम शांततेने स्वस्थ होऊन राहिला आहे. (८ ते १०)

**५६) अभंग :**

**मी वारा तू वारा । वारा बघ बघ वारा ।।धृ ।।**
**अस्तिगुणे व्यापक मी । अनंत एकची सारा ।**
**भातिगुणे बहुरंगी दाखवी सार असारा ।।१ ।।**
**कणाहुनी विकसुनी । पूर्ण मी एक अपारा ।**
**प्रियाप्रिया गाठी जरी आनंद जगभर सारा ।।२ ।।**
**सूर्यही मी चंद्रही मी । आकाश शब्द पसारा ।**
**जड वायू अचिद्‌पणे । तो मी नीरसमुद्रा ।।३ ।।**
**अनंत तो एकची मी । परी हा द्वैत पसारा ।**
**द्वैत वरी अद्वयची । दासरामी हृदी सारा ।।४ ।।**

**शब्दार्थ :**

(१) अपार – अमर्याद. (२) सारा – सगळा, पूर्ण, पुरा.

(३) अद्वय – द्वितीय संबंध शून्य.





**विवरण :**

तुझ्यामाझ्यामध्ये भरून राहिलेले हे सर्वव्यापी चैतन्यवारे पहा ! ‘अस्तिभाति प्रिय’ हा जगातील अनुभव आत्म्याच्या सच्चिदानंद स्वरुपामुळेच येतो. सत् म्हणजे अस्तित्व. निखळ असण्याच्या रुपाने, पूर्णत्वाने सर्वत्र मीच व्यापून आहे. सारअसारानी भरलेले हे बहुरंगी विश्व ‘भाति’ गुणाने, जाणीवेमुळे दृष्टीस पडते आहे. अशा विश्वातील सूक्ष्म कणापासून मीच अमर्यादपणे विकसीत झालो आहे. जगातील गोष्टींच्या ‘प्रिय-अप्रिय’ अशा अनुभवाच्या पाठीमागे ‘आनंदप्राप्ती’ हाच हेतू असतो. (१-२)

या विश्वातील सूर्य-चंद्र मीच असून शब्दगुणानी युक्त आकाशही मीच आहे. तसेच मीच या विश्वातील जड वायू असून नीरसमुद्रही मीच आहे. द्वैताच्या या पसाऱ्यात अनंतरुपाने एक मीच मी नटलेला आहे. असे हे द्वैत सर्वत्र भासूनही दासरामाच्या हृदयी मात्र तेच चैतन्यवारे अद्वयरुपानी पूर्णपणे व्याप्त आहे. (३-४)

**५७) अभंग :**

**तूची मला सोड वायू तूची मला सोड रे ।।धृ ।।**
**तुझी माझी कइची भेटी । जई जीवन नव्हते सृष्टी ।**
**गगन बुडबुडा तव पोटी । नवल तुझे कोड रे ।।१ ।।**
**तू मी दोनी एकची असता । काय दाविसी अहंता ।**
**फजितची झालो पुरता । होऊनी गेलो रोड रे ।।२ ।।**
**तू मी मिसळू एकात । संपवोनी सारे द्वैत ।**
**जीवन हे करु अद्वैत । तेची वाटे गोड रे ।।३ ।।**
**माझी ऐक विनवणी । कवाड हे दे उघडोनी ।**
**नेई निरंजनी झणी । दासराम झोंड रे ।।४ ।।**

**शब्दार्थ :**

(१) झोंड - झोंबी घेणारा.

(२) कोड- इच्छा, कौतुक.

(३) बुडबुडा – हवेने भरलेला फुगा.

**विवरण :**

हे अहंस्फुरणाच्या चिद्वायू, तू मला सोड ! हा चैतन्याचा वारा म्हणजे चिद्वायू होय. जगाच्या उत्पत्तिपूर्वी ही सृष्टी नव्हती. हे दृश्य नव्हते. एक निश्चळ निरंजन वायू सत्रुपाने नुसता वर खाली होत होता. या सत्‌ला झालेले पहिले 'अहं' हे स्फुरण/स्फूर्ति हीच जीवदशेच्या निर्मितीची सुरुवात. तेंव्हापासून आपण एकत्र आहोत. अशा या निरंजनाच्या ठिकाणी चिद्गुणाच्या योगे चंचळत्व निर्माण होऊन चिद्गगनाचा फुगा निर्माण व्हावा हे केवढे बरे अद्भुत आश्चर्य ! (१)

हे निरंजना, तू आणि मी एकच आहोत. तुझ्या सत् रुपापासून वेगळे पाडणारे चिद् चे अहंस्फुरण सुध्दा मला दाखवू नकोस. (२)

तू आणि मी हे द्वैत संपवून केवळ अद्वैत अशा निरंजनरुपाने हे जीवन भरून टाकू. तुझ्या या निश्चळ सत्रुपाचीच मला केवळ गोडी आहे. (३)

तुझ्या नि:शब्द, निश्चळ, सत्रुपाचे कवाड उघडून मला सत्वर या निरंजनस्थानी ने अशी तुझ्या स्वरुपाशी झोंबी घेणारा दासराम तुला विनवणी करीत आहे. (४)





**५८) अभंग :**

**अंतरी या बसुनी कोण । मनीचे छेडी बहुविध सूर ।।धृ ।।**
**नवल कैसे होय सारे । काय हृदयी भरत वारे ।**
**साक्षिरुपे देखुनी दिव्य पसारे । राही आपणची दूर ।।१ ।।**
**निरंजनी हा भेद कैचा । पूर लोटे हरतऱ्हेचा ।**
**सुखीदु:खी सवडी आनंदाने । भरते सहजची ऊर ।।२ ।।**
**विचारे या चूर करितो । निर्विचारे गुंग होतो ।**
**कोण करी ही ऐसी नवी नवलाई । जीव करी आतुर ।।३ ।।**
**कोण दावी अहंकार । कोण करितो निर्विकार ।**
**मीपण हे सांडुनी जडता तेथे । दृष्टांताचा पूर ।।४ ।।**
**आत्मरुपी लहरी उठली । तेची विश्वाकार झाली ।**
**जीव शिव हे तेथची वितरुनी पुढती । जीवन करी काहूर ।।५ ।।**
**संतमुनी हे तेथ रमले । आत्मरुपाकार झाले ।**
**त्या शरण होऊनी रहाता वाटे दासरामी हुरहूर ।।६ ।।**

**शब्दार्थ :**

(१) सवडी – वेळी, जागी. (२) वितरणे – देणे, प्रसन्न होऊन बहाल करणे.

**विवरण :**

देहाच्या अंतरी बसून मनीचे बहुविध सूर कोण बरे छेडित आहे ?

देहामधील शिरोहृदयामध्ये साक्षीरुपाने दूर राहून चैतन्याचा दिव्य पसारा पहाण्याचे नवल कसे बरे घडत आहे ? (१)

निरंजनाच्या ठिकाणी अभेद असूनही येथे मात्र सुखदु:खाचा पूर लोटतो

आहे. परंतु अशावेळी ही सहजपणे आनंदाचे भरते येऊन ऊर भरून येण्याची किमया कशी बरे घडते आहे ? (२)

विचारामध्ये चूर होणे तसेच निर्विचार अवस्थेत निमग्न होणे अशा दोन्हींची जीवाला आतुरता दाखविणारी नवलाई कोण बरे करतो आहे ? (३)

जो अहंकाराचे वारे निर्माण करतो तोच निर्विकारही करतो. मीपणा लयास जाताच दृश्याचा अंत होऊन आत्मस्वरुपाचा पूर कोण निर्माण करतो ? (४)

निश्चळ निरंजनामधून उठलेल्या आत्मलहरी विश्वाकार होतात. हे चैतन्य ज्ञानाच्या उपाधीने शिव व अज्ञानाच्या उपाधीने जीव होते. अज्ञानी जीवाच्या जीवनात मात्र भ्रांतीचे काहूर माजते. (५)

आत्मस्वरुपाकार होऊन संतमुनी तेथेच रमले. अशा संतांना शरणागत होताना निश्चळ स्वरुपाच्या वाटेवर या दासरामाला अनामिक हुरहूर वाटते आहे. (६)

५९) अभंग :

**कोण छेडी सूर मनीचे कोण छेडी सूर मनीचे कोण छेडी सूर ।**
**शून्य दृष्टी साक्षिरुपे कोण राही दूर ।।१ ।।**
**निरंजनी भेद कैचा केवी होय पूर ।**
**सुखदु:ख आनंदाने केवी भरे ऊर ।।२ ।।**
**विचारेची चूर होई विचारेची चूर ।**
**निर्विचार होवोनिया जीव हा आतूर ।।३ ।।**
**अहंकार मदाने या मुखी चढे नूर ।**
**काम क्रोध अज्ञानाचा लोटतसे धूर ।।४ ।।**





**पूर्ण ब्रह्म परमेश्वरु लावी हुरहूर जीवा ।**
**संत मुनी तये ठायी होती मने चूर ।।५ ।।**
**जीवशिव हे काहूर उचंबळे पूर ।**
**दासराम शरण त्यासी काढी दिव्य सूर ।।६ ।।**

**शब्दार्थ :**

(१) नूर – रंग, तेज. (२) काहूर – भ्रांति, भय. (३) पूर – ओघ, लोंढा.
(४) चूर – गर्क, मग्न. (५) सूर – ध्वनि.

**विवरण :**

शून्य दृष्टी साक्षिरुपाने दूर राहून कोण बरे हे मनीचे सूर छेडित आहे ? (१)

निरंजनाच्या ठिकाणी भेद नाही, द्वैत नाही. अज्ञानाच्या ठिकाणी मात्र हे सर्व आहे. अज्ञानाच्या उपाधीने जीव बनतो. अहंकाराने मदांध झालेल्या जीवावर जणू कांही काम, क्रोधरुपी अज्ञानाचा धूरच लोटतो. त्यामध्ये सापडून सुखदु:खाने त्याचा ऊर भरून येतो.

परंतु सारासार विचाराने जीव जेंव्हा अंतर्मुख होऊन निर्विचार अवस्थेत जातो तेंव्हा त्याचे मन संत मुनींच्या ठिकाणी मग्न होऊन रमू लागते. अशा जीवाला पूर्णब्रह्म परमेश्वरासाठी हुरहूर वाटू लागते. त्याच्या भेटीसाठी तो आतूर होतो. (२–५)

अंतर्मुख झालेला जीव साधनेच्या योगे शून्यदृष्टी साक्षिरुप शिवाकडे पाहतो आणि त्यानंतर जीवाशिवाच्या संयोगाचा पूरच सहस्त्रदळी उचंबळतो.

अशा या साक्षिचैतन्याला शरण गेलेल्या दासरामाकडून दिव्य सूर/दिव्य ध्वनि बाहेर पडत आहे. (६)

**६०) अभंग :**

**आपुला सांगाती असता पाठीशी ।**
**चिंता कासयाची करणे लागे ।।१ ।।**
**वारा मागे जरी वाटचाल सुखे ।**
**पुढे जरी ठाके वाट बंद ।।२ ।।**
**वारियाची कृपा प्रवास सुखाचा ।**
**दासरामी कैचा सिध्दांत हा ।।३ ।।**

**विवरण :**

चैतन्याच्या अधिष्ठानावर हा देह चालतो. अशा या अत्यंत निकट असलेल्या चैतन्याशी आपले अखंड अनुसंधान साधले असता आपल्याला कशाचीही चिंता करण्याचे कारण नाही. चैतन्याच्या वाऱ्याच्या संगतीत आपण अखंड असू तर आपल्या जीवनाची वाटचाल सुखाने होणार आहे. (१)

व्यवहारात वारा जर पाठीमागे असेल तर पुढची वाटचाल सहज होते. पण तोच वारा पुढून वाहू लागला तर पुढे वाटचाल करणे अवघड जाते. तसेच आपण जर देहबुध्दीची कास धरली तर पुढील वाऱ्यामुळे वाटचाल जशी अवघड जाते तसे जीवाची मोक्षाकडे होणारी वाटचाल बंद होते. (२)

सारांशाने, चैतन्याच्या वाऱ्याची कृपा असेल तरच जीवनाचा प्रवास सुखाचा होतो, अन्यथा नाही. असा हा सिध्दांत असून हा दासराम त्या चैतन्याच्या वाऱ्याचा कृपांकित आहे. (३)





**६१) अभंग :**

**स्मरतो बा तुजला हो वायो ।।धृ ।।**
**तुलाची प्रार्थीन तुलाची ध्यायीन ।**
**अर्पियले चित्त हे तुला ।।१ ।।**
**दासराम हा चरणी विनटला ।**
**संतसंग लाभला भला ।।२ ।।**

**शब्दार्थ :**

(१) विनटणे – तल्लीन होणे, रमणे.

(२) स्मरण – चिंतन.

**विवरण :**

हे चैतन्यदेवा, मी नित्य तुझेच चिंतन करतो. मी सदैव तुझीच प्रार्थना करतो. तुझेच ध्यान करतो.

माझे अवघे चित्त तुला अर्पण केले आहे. चित्ताचा धर्म चिंतन करणे हा आहे. चित्त अर्पण करणे म्हणजे अखंडपणे चिंतन करणे होय. चित्ताचा 'चैतन्य' हा एकच विषय झाल्याने चैतन्याचे अखंड स्मरण होत आहे. त्यामुळे चैतन्य म्हणजेच स्मरण झाले असून नामस्मरण आणि ध्यान एकरुप झाले आहे. (१)

अशा स्मरणरुप झालेल्या संतांचा भला संग लाभल्याने दासराम त्यांचे चरणी तल्लीन होऊन राहिला आहे. (२)

६२) अभंग :

वायो प्रसन्न होई। साधे स्वहित काही।
आम्हा उपाय दावी। दे आत्मता स्थिती ही।।१।।

दावी निजस्वरुपा। ये ठायी अग्निरुपा।
जाळोनी पुण्यपापा। करी धर्मनिष्ठ पाही।।२।।

तू एक धर्म आमुचा। तू एक मार्ग आमुचा।
आत्माची तू जगाचा। तू साह्य नित्य होई।।३।।

हनुमंतराय संत। त्वद्रूप गुरु समर्थ।
दासराम पायी संथ। तव पायी राहो डोई।।४।।

विवरण :

चेतन हे परमतत्व आहे. ते वाहिले म्हणून वायू. हे चिद्वायू, तू आम्हावर प्रसन्न हो.

आत्मस्थिती प्राप्त होऊन चैतन्याची प्रचिती येण्यातच खरे स्वहित आहे. अशा आत्मस्थितीचा उपाय दावून हे वायू, तू आम्हाला सहाय्य कर. (१)

हे अग्निरुप निजस्वरुपा, तुझ्या केवळ दर्शनाने पाप-पुण्य दोन्ही जळून नामशेष होतात. तूच या जगाचा आत्मा असून, तूच आमचा खरा धर्म आहेस.

तुझ्या चैतन्यस्वरुपाशी एकनिष्ठ राहणे हाच आमचा जीवनमार्ग आहे. या मार्गावर निष्ठेने चालण्यासाठी तू आम्हाला नित्य सहाय्य कर. (२-३)

तुझ्या स्वरुपाशी समर्थ सद्गुरु हनुमंतराय तद्रुप होऊन राहिलेले आहेत. त्यांच्या चरणाशी माझे मस्तक निवांतपणे नित्य रहावे अशी तुजला हा दासराम प्रार्थना करीत आहे. (४)





६३) अभंग :

ज्ञानदेवादी वारिया मिळाले वारेची होऊनी ठेले रे।
नाथिले जे तेची आथिले निराकारु साकार रे।।१।।

सकाम भक्ता सकाम होवुनी सकाम इच्छा पुरवी रे।
निष्कामे जो भजन मांडी संतासी त्या प्रसन्न रे।।२।।

सर्वाठायी निश्चळपणे देखे तो नि:शब्द रे।
मुक्याची भेटी मूकपणाने वेडा सांगे खुणा रे।।३।।

वाऱ्यासंगे हनुमंत नाचे दासराम त्या चरणी रे।
वायुलहरीची खूण बोधिली प्रसन्नता ये मना रे।।४।।

विवरण :

ज्ञानदेवादी संत हे चैतन्याशी एकरुप होऊन राहिलेले असतात. चैतन्य हे साकार आणि निराकार अशा दोन्ही रुपाने असते. ज्ञानदेवादी संत सदेहरुपाने असतात तेंव्हा निराकार असलेले चैतन्यच साकार होऊन प्रकट झालेले असते आणि ते देहरुपाने नसताना तेच चैतन्य निराकार रुपाने स्थित असते. असा हा चैतन्यदेव सकाम भक्तीची इच्छा पुरी करतो तसेच जे संत निष्काम होऊन अखंड त्या देवाच्या स्मरणात असतात, त्याच्याच भजनात अखंड असतात, त्यांच्यावरती प्रसन्न होऊन कृपा करतो. (१-२)

ज्याप्रमाणे मुक्या माणसाची भेट मूकपणानेच घ्यावी लागते तसेच सर्वाठायी असणाऱ्या नि:शब्द निश्चळाची भेट नि:शब्द, निश्चळ होऊनच घ्यावी लागते. अशा निश्चळ, नि:शब्दरुपाने असणाऱ्या चैतन्यलहरीचा बोध मनाला प्रसन्नता प्राप्त करुन देतो. (३)

चैतन्याच्या संगे, चैतन्यरुपाने नाचणाऱ्या सद्‌गुरु हणमंतरायांच्या चरणी दासराम लागत आहे. अशा तऱ्हेने चैतन्यलहरीच्या खुणेचा बोध झाल्याने दासराम अत्यंत प्रसन्न आहे. (४)

**६४) अभंग :**

**हनुमंते कृपा केली। वायुलहरी बोलविली।।१ ।।**

**मायबाप ते समर्थ। सर्व जाणती हे उचित।।२ ।।**

**दासराम तया शरण। हेचि मागे वरदान।।३ ।।**

**विवरण :**

भगवान सद्‌गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस यांच्या केवळ कृपेने या वायुलहरी बोलविल्या गेल्या आहेत. सद्‌गुरु श्रीतात्यासाहेबमहाराज हे उचित काय ते जाणणारे सर्वसमर्थ मायबाप आहेत. त्यांची कृपा सतत रहावी असे वरदान त्यांचेकडे मागून, हा दासराम त्यांना शरण येत आहे. (१ते ३)





**श्रीदासराममहाराजांची आरती**

आरती दासरामा।
निरंजन निजधामा।
मायबाप दिनानाथा।
कल्पवृक्ष पूर्णकामा।।ध्रु।।
सद्‌गुरु हनुमंतराये।
कृपादृष्टी लाभली।
गोविंद भक्तिची।
परिसीमा जाहली।। १ ।।
सिद्‌धानंद रुपाने।
नायरण प्रकटला।
गुरुलिंग गीतेचा।
अवतार जाहला।।२ ।।
सद्‌गुरु रामराया।
स्वामी सद्‌चिदानंदा।
नित्य स्मरण राहो।
तव पदारविन्दा।।३ ।।

**– नारायण देशपांडे**

**शब्दार्थ :** वितरणे – देणे, प्रसन्न होऊन बहाल करणे.

**विवरण :**

हा दासराम चैतन्यमय होऊन चैतन्याचाच आविष्कार असलेल्या या जगाकडे पाहून कौतुकाने, आनंदाने हसतो आहे. अणु, परमाणू, पाणी इत्यादी पासून चंद्रसूर्य हे सारे चैतन्याचे आविष्कार असून अवती भोवती सर्वत्र असलेल्या चैतन्यामध्ये मी विरून गेलो आहे. अखिल विश्व ही त्या चैतन्याचीच बाह्य उठावणी असून त्यामध्येच सारे जीव वस्ती करून आहेत. ज्याच्यावाचून कोणाचीही धडगत नाही अशा चैतन्याठायी मनाला पूर्ण समाधान प्राप्त झाले आहे. (१–२)

जीव व जगत ही चैतन्याची रुपे असल्याने जीवाला होणारे मनबुध्दीचे भान चैतन्यामुळे आहे. तसेच कुंठित/जड असलेल्या मनबुध्दीला होणारे जाणीवेचे भान चैतन्यामुळे आहे. अशा या देहातील विवरस्थानी असलेल्या अंतरात्म्याशी मी निश्चळ होऊन राहिलो आहे. निश्चळामधील आत्मस्वरुप चंचळाची लाट म्हणजे या वायुलहरी होत. मूळ अद्वय असूनही द्वैतरुपाने त्या जगताचा भास निर्माण करतात. अशा मूळ निश्चळापासूनच मी आलो आहे. अद्वय स्थितीशी एकरूप होऊन राहिल्याने ख्रिश्चन, मुस्लीम, हिंदू वगैरे बाह्य धर्म, जाती असे भेद दिसत नाहीत तर सर्वामध्ये असलेले चैतन्यच दिसते आहे. (३–५)

पाणी दुभंगण्याचा प्रयत्न केला तरी शेवटी ते पाणीच राहते. तसे कृत्रिम भेदभावानी चैतन्य दुभंगले जात नाही. अशा या चैतन्याशी मी मिळून गेलो आहे. अशावेळी सर्वच चैतन्यरुपाने असल्याने भांडावे तर कोणाशी ? मरणार कोण आणि मारणारा तरी कोण आहे ? सुखदु:खाचे भोग घेणारा माझ्यापेक्षा वेगळा कोणी नाही. हे सर्व पाहून गुरुपदांशी मी समाधान पावून राहिलो आहे. (६–७)





**श्रीदासराममहाराजांची आरती**

आरती दासरामा।
निरंजन निजधामा।
मायबाप दिनानाथा।
कल्पवृक्ष पूर्णकामा ।।ध्रु ।।

सद्‌गुरु हनुमंतराये ।
कृपादृष्टी लाभली ।
गोविंद भक्तिची ।
परिसीमा जाहली ।। १ ।।

सिद्‌धानंद रुपाने ।
नायरण प्रकटला ।
गुरुलिंग गीतेचा ।
अवतार जाहला ।।२ ।।

सद्‌गुरु रामराया ।
स्वामी सद्‌चिदानंदा ।
नित्य स्मरण राहो ।
तव पदारविन्दा ।।३ ।।

**– नारायण देशपांडे**